# वि. वा. शिरवाडकर

# कैकेयी

म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र. : 23330

IRBK-0123330

# कैकयी

**वि. वा. शिरवाडकर यांची**
**इतर पॉप्युलर प्रकाशने**

**नाटके**

आनंद
एक होती वाघीण
ऑथेल्लो
चंद्र जिथे उगवत नाही
नटसम्राट
मुख्यमंत्री
ययाती आणि देवयानी
विदूषक
वीज म्हणाली धरतीला
महंत
बेकेट

**काव्य**

मुक्तायन
छंदोमयी
मेघदूत

# कैकयी

वि. वा. शिरवाडकर

IRBK-0123330

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

कैकयी
पॉप्युलर प्रकाशन
(म– ५९५)

© पॉप्युलर प्रकाशन

पहिली आवृत्ती
१९८९ / १९११

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ 'सदाशिव',
टिळक रोड, पुणे – ३०

Kaikayee
( Play in Marathi )
V. V. Shirwadkar

या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क प्रकाशकाकडे आहेत. आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा प्रयोग कोणीही करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी व परवानगी मूल्य यासंबंधात प्रकाशकाबरोबर पत्रव्यवहार करावा.

१९४७ नंतर
माझे बहुतांश लेखन
ज्या
घरात झाले
त्या मालुसरेंच्या
सरस्वती सदनास —

राम :

भरता, पूर्वी आपल्या पित्याने जेव्हा तुझ्या मातेचे पाणिग्रहण केले, तेव्हा ' हिचे ठिकाणी जो पुत्र होईल त्याला मी राज्य देईन ' अशी आपल्या पित्याने तुझ्या आजापाशी प्रतिज्ञा केली आहे.

[ —श्री वाल्मीकी रामायण
अयोध्याकांड, सर्ग १०७
मराठी भाषांतर चिपळुणकर कंपनी ]

म. ग्रं. ... ग्रंथालय शाखा.
क्र. 23330 ता. ते १७/५/८९
कि. ...नाटक

# अंक पहिला

कैकयीचा महाल.

वेळ रात्रीची.

समोरच्या बाजूला असलेल्या मोठ्या खिडकीजवळ कैकयी पाठमोरी उभी आहे. बाहेरची दृश्ये तन्मयतेने पाहात आहे.

नगरातील जयघोषांचा आणि विविध वाद्यांचा अस्पष्ट कोलाहल कानावर येत आहे. लाल-निळ्या रंगाच्या प्रकाशधारा आकाशाचा भेद करताना दिसतात. रामाच्या नावाचा जयजयकार करणारी एक मिरवणूक रस्त्यावरून जात आहे.

महालाच्या दाराशी एक दासी येऊन उभी राहाते, कैकयीचे लक्ष आपल्याकडे वळण्याची वाट पाहात. मिरवणूक दूर जाते आणि खिडकीवरील पडदे सरकवून कैकयी मागे वळते.

**कैकयी :** ( पुढे येत ) रेवती, तू का अशी इथं तिष्ठत उभी आहेस ? केव्हा आलीस ते मला कळलंही नाही.

**दासी :** किती तरी वेळ झाला.

**कैकयी :** मग मला हाक तर मारायची.

**दासी :** तेही करून पाहिलं. पण नजर काही इकडे वळली नाही.

**कैकयी :** ( हसते ) खरंच ग. नुसती नजरच बाहेर पाहात असती तर ती वळलीही असती कदाचित. पण महालाच्या गवाक्षात मी उभी होते आणि डोळ्यांच्या गवाक्षात माझं अंतःकरण जाऊन बसलं होतं. तुझी हाक ऐकायला जागेवरती होतं कोण ?

**दासी :** खरंच—भगवतींच्या आनंदाला आज मर्यादा राहिलेली दिसत नाही.

**कैकयी :** कशी राहाणार ? समुद्राच्या जवळ आलेल्या नदीसारखी माझ्या मनाची

अवस्था—उद्या सकाळचा सूर्य केव्हा उगवेल असं झालंय् मला.

**दासी :** सर्वांनाच वाटतंय् तसं. युवराजांवरचं लोकांचं प्रेम अपारच आहे.

**कैकयी :** त्या प्रेमाचंच दर्शन मी घेत होते. आनंदानं मोहरलेल्या नागरिकांचे कंठ तर राहोच, पण सौधासौधांवर पेटलेल्या दिव्यांच्या रांगाही रामाच्या नावाचा जय-जयकार करीत आहेत असं वाटतं. केशर-कुंकवाच्या रंगानं जमीन आणि चंदन-कस्तुरीच्या सुगंधानं, आकाश कसं थबथबून गेलं आहे. आज आनंदाचं नाव अयोध्या आहे.

**दासी :** भगवती, या आनंदात एकच उणीव आहे.

**कैकयी :** उणीव ? कसली ग ?

**दासी :** आज भरतमहाराज इथं असते तर बरं झालं असतं.

**कैकयी :** ( किंचित अस्वस्थ ) होय, बरं झालं असतं. खरंच, भरत आज राजधानीत असायला हवा होता. पिताजी स्वतः आले नाहीत आणि त्यांनी मुलांनाही पाठवलं नाही. काही तरी महत्त्वाचं कार्य असेल तिथे—जा तू. परत का आलीस ? मी सांगितलं होतं ना – आज सर्वांनी समारंभ पाहायला जायचं म्हणून ? सावलीसारखी सतत माझ्या पाठीशी उभी राहणारी मंथरा – पण तिलाही मी सांगितलं की रामाचा रथ अश्वशाळेत आल्याशिवाय परत येऊ नकोस म्हणून.

**दासी :** मंथरादेखील गेली ? आणि मग हा साजशृंगार भगवतींच्या अंगावर कोणी चढवला ?

**कैकयी :** मीच, माझ्या हातानं.

**दासी :** आजच्या आनंदोत्सवातली ही दुसरी उणीव म्हणायची. महाराणींना स्वतःच्या हातानं सारा शृंगार चढवावा लागला !

**कैकयी :** त्यात काय बिघडलं ? ( आरशासमोर जात ) म्हटलं, समारंभ संपला की महाराज विश्रांतीसाठी यायचे आहेत, ते माझ्या महालामध्ये. माहेर – सासरच्या कोशागारातील अमूल्य रत्नांचे हे अलंकार घालूनच आज त्यांचं स्वागत करायला नको का ? केव्हा येताहेत कुणास ठाऊक. देवप्रतिष्ठेचा समारंभ आटोपला का ?

**दासी :** होय, भगवती. प्रतिष्ठेचा समारंभ आटोपून सर्व मंडळी आता सभागाराकडे गेली आहेत. शुक्राच्या ताऱ्यासारखे युवराज त्या मेळाव्यात दिसत होते. अनेकांनी उद्‌गार काढले की हा साक्षात् शेषशायी विष्णूचाच अवतार आज अयोध्येत प्रगट झाला आहे.

**कैकयी :** ( मंचकावर बसत ) माझ्या रामाचं तेजोवैभवच तसं आहे—आणि माझ्या भरताचंसुद्धा. खरंच, तो आज इथं असता तर त्याच्याकडे पाहूनही लोकांनी असेच उद्‌गार काढले असते, नाही ?

**दासी :** काढले असते कशाला ? कित्येकजण तसं म्हणालेही. या जागेवर भरतमहाराज

असते तर त्यांची मूर्ती याहूनही अधिक तेजस्वी आणि यथायोग्य दिसली असती असे उद्‌गार अनेकांच्या तोंडातून निघाल्याविना राहिले नाहीत.

**कैकयी :** खरंच ?

**दासी :** इतरांचं कशाला, स्वतः युवराजांनाही आपल्या सत्त्वशील भावाची आठवण तीव्रतेनं झाली. सभागारात जाताना युवराज मला म्हणाले, कैकयीमातेकडे जा आणि त्यांना सांग की थोड्याच वेळात मी आशीर्वादासाठी तुमच्याकडे येतो. आणि म्हणाले, भगवतींना सांग की, उद्या अभिषेकप्रसंगी भरत अयोध्येत नाही असं आपण समजू नका, राजपदाचा मुकुट त्याच्याही मस्तकावर चढत आहे असंच समजा; राम हा केवळ राम नाही, तो भरत आहे; लक्ष्मण आहे आणि शत्रुघ्नही आहे; चार नद्यांचे प्रवाह एकत्र येऊन नंतर एकच नाव धारण करतात त्याप्रमाणे चार भावांच्या मीलनाचं राम हे नाव आहे—केवळ कौसल्येच्या मुलाचं नव्हे.

**कैकयी :** ( भाववश ) रामा, राजपदाच्या मुकुटाबरोबर तिन्ही मातांचे आशीर्वाद तू मस्तकावर धारण करशील. पाठीवर आलेला कौसल्येचा हात कोणता आणि कैकयीचा कोणता, हे तुला कधीच समजलं नाही. उद्याही समजणार नाही. चार मुलांत तीन मातांनी कधीच भेद मानला नाही. होय, माझ्या भरतालाच उद्या युवराजपदाचा राज्याभिषेक होत आहे असं मी मानीन. या आनंदोत्सवात जिच्या मनात काही विकल्प येईल, अशी कोणती चांडाळीण आहे ?

( या वाक्याचा उच्चार होत असतानाच मंथरा दारात येऊन उभी राहते. साधारणतः कैकयीच्याच वयाची, देखणी पण या क्षणी विस्कटलेली आणि संतप्त ).

**मंथरा :** ( पुढे येत ) मी आहे ! कैकयी, तू मला चांडाळीण म्हण—खुशाल चांडाळीण म्हण—

**कैकयी :** कोण मंथरा ? ( उठून पुढे येते ). का ग ? अशी घायाळ झाल्यासारखी का दिसते आहेस ? देवप्रतिष्ठेचा समारंभ पाहायला गेली होतीस ना ? असे निखारे डोळ्यांत घेऊन का आली आहेस ? वारुळातून उठवलेल्या नागिणीसारखी अशी संतापानं फणफणते आहेस, का ? काय झालं तुला ? कोणी बोललं, कोणी अपमान केला ?

**मंथरा :** कैकयी, मी सांगितलं ना, मला खुशाल चांडाळीण म्हण, मला त्याची पर्वा नाही.

**कैकयी :** अग पण काय झालं ते तर सांगशील ? कोण तुला चांडाळीण म्हणणार आहे, आणि कशासाठी ? रेवती, तू जा, आणि महाराज आले की मला वर्दी दे. ( दासी जाते. ) मंथरे, काय झालं ते लौकर सांगून टाक. मला भीती वाटायला

लागली आहे. तू आत आलीस मात्र. माझ्या मनात कल्पना आली की हजारो दिव्यांनी अयोध्येतून हद्दपार केलेला सारा काळोख, तुझ्याबरोबर या दरवाज्यातून माझ्या महालात प्रवेश करीत आहे. मंथरे, मी भयभीत झाले आहे.

**मंथरा** : होय, काळोखच ! महाराणी, तुझ्या महालात या मध्यरात्रीपासून काळोखच राहायला येणार आहे. त्या भयाण काळोखामध्ये, एक दिवटी हातात घेऊन, माझा भरत–माझा भरत–म्हणून आक्रोश करीत एखाद्या पिशाच्चासारखी तू जन्मभर भ्रमत राहणार आहेस. कैकयी, तुला आनंद वाटला तो खोटा होता. तुला आता भीती वाटते तीच खरी आहे.

**कैकयी** : मंथरे, तू काय बोलते आहेस ? का बोलतेस असं ?

**मंथरा** : तू आनंदात मग्न आहेस ना ? राहा, अशीच आनंदात राहा. गवाक्षात उभी राहून अशीच दिव्यांची आरास पाहात राहा, म्हणजे समोर येऊन उभी राहिलेली, तुझं आणि तुझ्या मुलाचं कपाळ फोडण्यासाठी जवळ आलेली, भविष्याची अक्राळविक्राळ अवदसा तुला दिसायची नाही. अशीच–अशीच सज्ज्यात उभी राहून खुषमस्कऱ्यांनी केलेले युवराजाचे जयघोष ऐक, म्हणजे त्या अवदसेचं क्रूर कुटिल हास्य तुझ्या कानापर्यंत पोचायचं नाही.

**कैकयी** : ( असहाय्य स्वरात ) मंथरे—

**मंथरा** : अंगावर हा साजशिणगार चढवला आहेस–कशाकरता ? राजाच्या रत्नागारातील अलंकार गळ्यात घातले आहेस–का ? विवाहाच्या वेळी, वयातील अंतराची भरपाई करण्यासाठी दशरथ महाराजांनी दिलेले हे झळझळीत दागिने आज अंगावर डौलानं मिरवीत आहेस–कोणासाठी ? या महालात पहिल्या रात्री नटली नव्हतीस एवढी आज नटली आहेस. ठीकच आहे. तुझा आणि तुझ्या मुलाचा सत्यानाश करून महाराज रंगमहालात आले म्हणजे त्यांच्या म्हाताऱ्या कामवासनेचं स्वागत करायला हा सारा शृंगार पाहिजेच. स्थंडिल पेटायचंच असेल, तर समिधांनी नाही म्हणून कसं भागेल ?

**कैकयी** : कोण माझ्या आणि भरताच्या जीवनाचा नाश करणार आहे ? मंथरे, अशी आडवळणानं बोलून माझ्या जिवाचा कोंडमारा करू नकोस. बालपणापासून तू जिवाभावानं सतत माझ्या पाठीशी उभी राहिली आहेस. मी अयोध्येला आले तेव्हा तुझ्या रूपानं मी माझं माहेरच बरोबर घेऊन आले असं मी मानलं–आजही मानते आहे. तू कधी वादळासारखी अचानक उसळतेस, कधी अमावास्येच्या रात्रीप्रमाणे गूढ काजळी रहस्यात स्वतःला गुरफटून घेतेस, कधी वैराण वाळवंटासारखी भेसूर मौनामध्ये विलीन होतेस. पण मंथरे, आजच्यासारखं तुझं हे उग्र निर्दय स्वरूप मी कधीच पाहिलं नव्हतं. सांग–मथरे, सांग–स्मशानातल्या झाडासारखी तू अशी भकासपणानं, काही न बोलता उभी राहशील–तर मी मागते–या

मंचकाच्या कठड्यावर मी कपाळ फोडून घेईन ! मी असं काय केलं आहे, म्हणून तू इतक्या निर्दयपणानं माझ्याशी वागतेस ?

**मंथरा :** ( जवळ जाते ) कैकयी, मला क्षमा कर. बोलू नये ते मी बोलून गेले, खरंच क्षमा कर मला, भलतंच बोलत सुटले मी. पण कैकयी, मी तरी काय करू ? माझं काळीज पेटलं म्हणून माझे शब्दही पेटले. जे मी ऐकलं ते तू ऐकलं असतंस, तर तूही माझ्यासारखीच पेटली असतीस, असंच वागली असतीस.

**कैकयी :** काय ऐकलंस तू ?

**मंथरा :** काहीच ऐकलं नाही मी. ( पुन्हा दूर जात ) कैकयी, अज्ञानाच्या चिखलात माणसं किड्यासारखी का होईना, जर सुखानं राहात असली तर त्यांना त्यातून बाहेर कशासाठी आणायचं ? चिखलात लोळण्यातहीं सुख आणि सिंहासनावर बसण्यातही सुखच. सुख मिळालं म्हणजे झालं.

**कैकयी :** आग लागो त्या चिखलातल्या सुखाला. मंथरे, माझा प्रश्न अजून कायम आहे.

**मंथरा :** माझं उत्तरही कायम आहे. शंभर सर्पांचे दंश माझ्या काळजाला होतात, तेवढं पुरे आहे. ही वेदना तुझ्यापर्यंत पोचविण्याचं मला कारण नाही.

**कैकयी :** मंथरे, तू माझी मैत्रीण आहेस, त्याप्रमाणे माझी—

**मंथरा :** तुझी दासीही आहे. अगोदर दासीच आहे. पण कैकयीच्या राजघरात मला दासीसारखं कोणी वागवलं नाही. आणि महाराणी, तूही स्वामिनी म्हणून नव्हे, तर सखी म्हणूनच माझ्या प्रेमाचा, निष्ठेचा स्वीकार केलास. आता असं वाटतं, हे झालं नसतं तर बरं झालं असतं. दासी ती दासीच राहिले असते—तर तुझ्यासाठी, तुझ्या मुलासाठी, अंतःकरण असं तडफडलं नसतं. एका जिवानं दोन शरीरं धारण करावीत तसं आपण वागत आलो त्या अपराधाचं प्रायश्चित्त मी आज भोगते आहे. तुझा भरत हा माझाच भरत आहे, असं मी समजले. त्याचं हे शासन मला सोसावं लागतं आहे.

**कैकयी :** होय, भरत जितका माझा तितकाच तुझाही आहे. माझ्या कुशीत त्यानं जन्म घेतला, पण तुझ्या पदराखाली त्याचं संगोपन झालं आहे. त्याबद्दल तुला जर काही शासन होणार असेल तर त्यात मीही वाटेकरीण व्हायला तयार आहे. भरताची आई म्हणून, तुझी सखी म्हणून.

**मंथरा :** कैकयी, शासन माझ्यासारख्या दासीनं सोसायचं असतं तू राणी आहेस. तुला शासन करण्याचा अधिकार आहे. राणी म्हणून तुझा तो अधिकार आहे— आणि आई म्हणून तुझं ते कर्तव्य आहे. ( आवेशाने कैकयीकडे वळून ) कैकयी, तुझ्यावर मंचकापुरती माया करणाऱ्या दशरथराजानं तुझा आणि भरताचा आज विश्वासघात केला आहे. त्या कपटी थेरड्यानं—

**कैकयी** : ( संतापाने ) मंथरे !

**मंथरा** : मी आज निःशंक आहे. सत्यासारखी निर्भय आहे. न्यायासारखी निर्दय आहे. कैकयी, मंचकावरील या उशागिऱ्यांपेक्षा तुझ्या जीवनाला अधिक कोणता अर्थ आहे ? कोणती किंमत आहे ? राजाची आवडती राणी म्हणून तू राणीवशात मिरवते आहेत. पण राजाचं हे तुझ्यावरचं प्रेम सूर्य मावळल्याशिवाय उगवत नाही, दिवे पेटल्याशिवाय दिसत नाही. स्त्रीच्या स्वाभिमानाला सहन होऊ नये असं हे पलंग-प्रेम- कैकयी, तुला किळस वाटायला हवी असल्या प्रेमाची, आणि असल्या जगण्याची. राजाची माता म्हणून तुझा गौरव होण्याचा प्रसंग येताच महाराजांनी एखाद्या निकामी, गलिच्छ पायपोसासारखी तुला दूर फेकून दिली. राजमाता होण्यासाठी जन्माला आली ती तुझी सवत कौसल्या. तुझा जन्म केवळ राजाच्या मिठ्या सहन करण्यासाठी.

**कैकयी** : नाही—खोटं आहे हे !

**मंथरा** : खोटं ? रामाला राज्याभिषेक करताना तुला एका शब्दानं तरी त्यांनी विचारलं का ? जे तुझ्या हक्काचं आहे, ते तुझ्यापासून हिरावून घेताना, एका अक्षरानं तरी तुझं सांत्वन करण्याचं सौजन्य कोणी दाखवलं का ?

**कैकयी** : ( क्षीण स्वरात ) पण—पण ( मंचकावर बसते ) रामात आणि भरतात मी असा भेद कधी मानला नाही. भरताइतकाच रामही मला प्रिय आहे.

**मंथरा** : तसं असेल तर भरताची — कोणत्याही मुलाची माता व्हायला तू अपात्र आहेस जी आई आपल्या मुलावर पुरेसं प्रेम करू शकत नाही, जन्म देते आणि नंतर बेजबाबदारपणे त्याला वाऱ्यावर सोडून देते, औदार्याचा खोटा बडेजाव मिरवण्यासाठी त्याच्या हिताला चूड लावते, ती मुलाची आई नाही, तर त्याची निव्वळ वैरीण मानायला हवी.

**कैकयी** : ( खचत चाललेली ) पण राम ज्येष्ठ आहे, राजपदाचा त्याला अधिकार आहे.

**मंथरा** : राजपदावर अधिकार आहे तो फक्त भरताचाच. वडीलकीला नमस्काराचा अधिकार असतो. सिंहासनाचा असतोच असं नाही. भरत हा रामाहूनही अधिक पराक्रमी आहे, अधिक सत्त्वशील आहे—कर्तबगार आहे. पण इतकंच नाही. विश्वासघात झाला आहे तो दिलेलं वचन नीचपणानं उधळून देण्यात. कैकयीच्या मुलालाच आपल्यानंतर राजपद मिळेल असं अभिवचन दशरथ महाराजांनी तुझ्या पित्याला, कैकेय राजाला, तुझ्या विवाहाच्या वेळी दिलं होतं. ते वचन, सत्योपासक म्हणून मिरवणाऱ्या रघुकुलातील दशरथानं पायाखाली तुडवलं आहे.

**कैकयी** : असं वचन दिलं होतं ?

**मंथरा** : भरतावर प्रेम करणाऱ्या एका वृद्ध अमात्यांकडून हा सारा वृत्तान्त मला

आज समजला. तो स्वतः साक्षी होता त्या प्रसंगाला. पताका-तोरणांच्या मांडवात आणि वाद्यांच्या धुमाळीत सत्याचा होणारा खून असह्य झाला म्हणून तो एका कोपऱ्यात जाऊन आसवं ढाळीत होता.

**कैकयी :** विश्वासघात !

**मंथरा :** भरताला तुझ्या पित्याकडे पाठवून दिलं ते उगाच नाही. मार्गामधली अडगळ काढून टाकली. दूरदेशी असलेल्या भरताला समारंभासाठी बोलावयाची सभ्यता देखील कोणी दाखवली नाही. तुझ्या मुलाला बोलावलं नाही, आणि तुझ्या पित्याला कळवलं नाही. असं हे सारं कारस्थान.

**कैकयी :** पण मला हे पिताजींनी अगोदर का सांगितलं नाही ?

**मंथरा :** राजपुत्रांत वितुष्ट येऊ नये म्हणून राजपदाचा प्रश्न उपस्थित होईपर्यंत या वचनाची वाच्यता करू नये असं उभयतांत ठरलं होतं. पण राजाच्या सर्व प्रमुख सचिवांना आणि पुरोहितांना हे ठाऊक आहे. बहुधा रामाला आणि कौसल्येलाही. सर्वांनी मिळून उभं केलेलं हे अमंगल कारस्थान आहे; आणि म्हणूनच कुटिल स्वार्थाचा, अमर्याद मत्सराचा, आणि निर्लज्ज पक्षपाताचा हा विजयोत्सव पाहाताना, आपल्याला डोळे आहेत या गोष्टीचा मला विषाद वाटला. अन्याय आणि असत्य ही जर इतक्या उजळपणानं पृथ्वीवर मिरवणार असतील तर दैत्यांच्या पायाखाली तिचा संहार व्हावा हेच योग्य.

**कैकयी :** ( स्वतःशी ) माझा भरत—माझा लाडका! एवढ्यासाठी कपटानं त्याला दूरदेशी पाठवून दिलं ? कसं सहन करू हे ?

**मंथरा :** कैकयी, मी जाते. महाराज इकडे यायची वेळ झाली आहे. त्यांचं स्वागत करण्यासाठी तू नखशिखान्त नटली आहेस. या उदार प्रेमाच्या सोहळ्यात माझ्या जळफळाटाचा व्यत्यय नको. तू या रंगमहालात विलासात मग्न होऊन राहा. मी राजवाड्याच्या एखाद्या कोपऱ्यात बसून माझ्या भरतासाठी रडत राहीन.

( बाहेर जाते ).

( क्षणभर स्तब्धता— )

**कैकयी :** का—का—अशी सर्वांनी माझ्याशी, माझ्या भरताशी प्रतारणा केली ? ( नागिणीसारखी उफाळत— ) नाही — मी आता दशरथ राजाची पत्नी नाही, अयोध्येची राणी नाही—मी आता फक्त भरताची माता आहे. फक्त माता. महाराजांच्या स्वागतासाठी अंगावर चढवलेले हे अलंकार —

( अंगावरील अलंकार तोडून फेकून देते आणि पुन्हा मंचकावर कोमळल्यागत पडते ).

**दासी :** ( प्रवेश करून ) भगवती, महाराज आले आहेत.

**कैकयी :** कोण महाराज ?

**दासी :** महाराज आले की वर्दी द्यायला आपण सांगितलं होतं. स्वारी इकडे येत आहे.

**कैकयी :** महाराजांना सांग, तुमची पत्नी कैकयी म्हणून होती ती मेली, महालात फक्त एक जखमी झालेली नागीण आहे, आपण माघारी जा.

**दासी :** महाराणी–असलं भलतंसलतं––

**कैकयी :** जा—जाऊन सांग तू. त्यांना आधी कळायला हवं.

**दासी :** आज्ञा भगवती. ( जाते. )

**कैकयी :** महालाच्या दारातच त्यांना कळायला हवं. शय्येशी बांधलेलं हे पत्नीपण–माझीच मला किळस वाटते आहे. स्पर्शाच्या अभिलाषेने बरबटलेले ते डोळे, आलिंगनासाठी आसावलेले हात, मुखमीलनासाठी थरथरणारे ओठ–शिसारी–शिसारी—

( दशरथ येतो, थबकतो. )

**दशरथ :** कैकयी, आताच दासीनं सांगितलं, तुझी प्रकृती बरी नाही म्हणून. काय होतंय तुला ?

**कैकयी :** ( पुढं येत ) महाराज आपण माघारी वळला असता तर बरं झालं असतं–दासीनं तुम्हाला सांगितलं नाही ? अखेरच्या तळापर्यंत मला ओढीत नेणार आहात ?

**दशरथ :** तू काय बोलते आहेस, मला समजत नाही. केवढ्या आनंदानं मी इथं आलो होतो !

**कैकयी :** म्हणूनच म्हणते, माघारी जा–अजूनही. आनंदानं दुःखाच्या घरामध्ये येऊ नये. महाराज, आपण कैकयीच्या नव्हे, तर दुःखाच्या आणि क्रोधाच्या महालात आला आहात. म्हणून सांगते—आल्या पावली माघारी जा.

**दशरथ :** माझी लाडकी राणी दुःखात असली तर तिच्या शेजारी उभं राहणं हे माझं कर्तव्य आहे.

**कैकयी :** शब्द, नुसते शब्द ! महाराज, या सुंदर शब्दांची प्रेतयात्रा या महालातून केव्हाच निघून गेली आहे. आता इथं उरला आहे तो व्यवहार. नागडाउघडा व्यवहार. आपल्या म्हाताऱ्या नजरेला त्याचं दर्शन सहन व्हायचं नाही. म्हणून पुन्हा सांगते, तुम्ही निघून जा. आग पेटली आहे. तीत मी जळून जाईन किंवा भाजून कोळपून पुन्हा बाहेर येईन. पण आपण या जाळाच्या जवळ येऊ नका. एका क्षणाची ही मुभा आहे–मग मी माझी राहाणार नाही.

**दशरथ :** कैकयी, मला काहीच उमजत नाही. पण तुझ्या दुःखाचं, संतापाचं कारण समजल्याशिवाय मी येथून हालणार नाही. त्या जाळात मी जळून गेलो तरी हरकत नाही.

**कैकयी :** ठीक आहे. आपली तशी इच्छा असेल तर ऐका. महाराज, माझ्या दुःखाचं आणि क्रोधाचं कारण तुम्ही स्वतः आहात.

**दशरथ** : मी ? माझ्या परमप्रिय वल्लभेचा कोणता अपराध केला मी ?

**कैकयी** : अपराध झालाय तो भरताच्या आईचा

**दशरथ** : कैकयी, मी भांबावून गेलो आहे. काय तुझ्या मनात असेल ते स्पष्टपणानं सांग. भरताच्या आईचा तरी कोणता गुन्हा केला मी ?

**कैकयी** : फसवणूक–पक्षपात–विश्वासघात ! महाराज, राणीवशातील तीन राण्या आजवर पाठच्या बहिणीसारख्या राहिल्या. एकीच्या मुलावर तिघींच्या पदराची सावली होती. हे मायेचं देऊळ आता उध्वस्त झालं आहे. जिथं प्रेमाचं अमृत वरसत होतं, तिथं द्वेषाचे, वैराचे पाणलोट दुथडी भरून वाहायला लागले आहेत. आणि याला जबाबदार आहात तुम्ही.

**दशरथ** : काय केलं मी ?

**कैकयी** : अयोध्येच्या सिंहासनावर माझ्या भरताचा अधिकार असता, आपण रामाला युवराज्याभिषेक करीत आहात.

**दशरथ** : शिव शिव ! परमेश्वरा, सवतीमत्सराचा हा अमंगल, दळभद्रा उद्रेक पाहण्या-आधी माझं आयुष्य संपवलं असतंस, तर फार बरं झालं असतं !

**कैकयी** : हा प्रश्न महाराज, आता तुमच्या आयुष्याचा नाही. रामाला अभिषेक करायला तुम्ही तयार झालात, तेव्हाच आपल्या आयुष्याचा अस्तकाल सुरू झाला हे तुम्ही आणि तुमच्या सचिवांनी गृहीत धरलं आहे. तेव्हा वैतागाच्या शब्दांनी केलेल्या विश्वासघाताचं परिमार्जन होईल, असं आपण समजू नका.

**दशरथ** : कैकयी, रामाचा सिंहासनावर अधिकार नाही ? तो सर्वांत वडील आहे, सद्‌गुणी आहे. जगातल्या साऱ्या मांगल्यानं स्वतःचं शरीर म्हणून माझ्या रामाची निवड केली आहे.

**कैकयी** : हेच ते ! साऱ्या द्रोहाचं उगमस्थान. महाराज, आम्ही कधी सवतीमत्सर मानला नाही. कधी सावत्रपणा केला नाही. पण आम्ही एकमेकींना मिठ्या मारून बसलो असताना, आपण मात्र आपल्या अंतःकरणात पक्षपाताचं विषारी रोपटं रुजवीत बसला होता. रामाचे गुण पाहाताना आपल्या एकेक डोळयाला सूर्याचं सामर्थ्य येतं, आणि तीच नजर भरताकडे वळली-म्हणजे त्या डोळ्यांत काळोखाच्या गुहा निर्माण होतात. महाराज, माझं सौंदर्य माझ्या देहापेक्षा आपल्या विषयांध दृष्टीत अधिक आहे, त्याप्रमाणे रामाचे सद्‌गुणही रामापेक्षा आपल्या पक्षपाती वात्सल्यात अधिक आहेत. राम वडील आहे; होय आहे. पण माझ्या मुलाला सिंहासन द्यायला ज्या क्षणी आपण वचनबद्ध झालात, त्याच क्षणी इतरांच्या वडीलकीचा अधिकार संपला. माझ्या विवाहाच्या वेळी माझ्या पित्याला आपण असं वचन दिलं नव्हतं—? सांगा—

**दशरथ** : वचन—

**कैकयी :** दिलं नव्हतं ?

**दशरथ :** हो, दिलं होतं— पण—

**कैकयी :** खुलासे ऐकायची मला इच्छा नाही. याचा अर्थ इतकाच की, म्हातारपणच्या रंगविलासासाठी तुम्हाला एका लावण्यवती कुमारी आपल्या पलंगावर बळी द्यायची होती. तिची खरेदी करताना, बाजारात बसलेल्या व्यापाऱ्याप्रमाणे, आपण तोंडाला येईल ते आश्वासन दिलंत, निःसंग मनानं प्रतिज्ञा केलीत. आणि 'आता, त्या स्त्रीचं शरीर आपल्या विलासमंदिरात मनसोक्त राबवल्यावर तिची किंमत कवडीमोल झाली. आई म्हणून मला मिळालेली प्रतिष्ठा आपण मानायला तयार नाही. हा नुसता अपमान नाही. हा तिरस्कार आहे, माझ्या माणूसपणाचा आणि माझ्या मातृत्वाचा. या द्रोहाचं प्रायश्चित्त महाराज, आपण स्वीकारलं पाहिजे.

**दशरथ :** मी तुझी क्षमा मागतो, कैकयी. माझ्याकडून वचनभंग झाला हे खरं, पण तू म्हणतेस तसा त्याचा अर्थ नाही. भरतावरही माझं प्रेम आहे—

**कैकयी :** महाराज, माझी मागणी सांत्वनाची नाही, प्रायश्चित्ताची आहे.

**दशरथ :** तू सांगशील ते प्रायश्चित्त घ्यायला मी तयार आहे. पण माझ्या रामावर दया कर—

**कैकयी :** काय संबंध दयेचा ? मी मघाशीच सांगितलं की आता इथं फक्त उघडानागडा व्यवहार आहे. भरताला माझ्या पित्याकडे पाठवून, त्याच्या गैरहजेरीत हा सोहळा घाईगर्दीनं उरकून घेताना, आपण भरताला दया दाखवलीत ? दया राहो, प्रेम राहो, पण त्याला बोलवण्याचा, मला विचारण्याचा, साधा शिष्टाचार तरी आपण दाखवलात ? महाराज, दया, माया, प्रेम या साऱ्या भावनांच्या प्रेतांवर मी या क्षणी उभी आहे. या घटकेला आपण रामाचे पिते आहात आणि मी भरताची आई आहे. बस्, इतकंच मला ठाऊक आहे. आणि म्हणून मी निक्षून सांगते, आता प्रायश्चित्ताशिवाय पर्याय नाही. हे प्रायश्चित्त आपण तर स्वीकारालच, पण रामानंही ते स्वीकारलं पाहिजे.

**दशरथ :** कसलं प्रायश्चित्त ?

**कैकयी :** राजपदाचा मुकुट रामाच्या नव्हे तर भरताच्या मस्तकावर चढायला हवा. एवढंच नाही, इंद्राशी झालेल्या लढाईच्या प्रसंगी आपण मला वर दिलेला आहे. केव्हाही, कोठेही आणि काहीही मागण्याचा. प्रेम करणाऱ्या कैकयीला त्या वराची आठवणही नव्हती, आज माझ्या द्वेषाला त्याची गरज आहे. केव्हाही, कोठेही आणि काहीही. माझी मागणी मान्य करण्यावाचून, महाराज आपल्याला गत्यंतर नाही. ऐका माझी मागणी, भरत सिंहासनावर बसला पाहिजे आणि त्याचा प्रतिस्पर्धी अयोध्येत असता कामा नये. रामानं एक नव्हे, दोन नव्हे, चौदा 'वर्षांसाठी वनवासात गेलं पाहिजे.

**दशरथ :** ( थरथरत ) चौदा वर्षांसाठी वनवास ! चांडाळणी, तुझी जीभ झडून कशी पडत नाही ?

**कैकयी :** पर्याय नाही. महाराज, पर्याय नाही. हा वर आहे. देवाला साक्ष ठेवून दिलेला आणि तो मी मागितला आहे. आपण हो म्हणण्याचीही गरज नाही.

**दशरथ :** परमेश्वरा, कोणत्या पातकाची ही शिक्षा मी भोगतो आहे. ( आसनावर निश्चेष्ट होऊन बसतो. )

**कैकयी :** म्हणूनच म्हणत होते—माघारी जा ( हसते. ) महाराज, पत्नी संतापली तर फार तर पलंगातून बाहेर पडेल, पण माता जेव्हा क्रुद्ध होते तेव्हा ती सारं जग जाळून टाकते.

( दासी येते )

**दासी :** भगवती, महाराज राम आणि सीतादेवी येत आहेत.

**कैकयी :** येऊ दे.

( दासी जाते ).

**दशरथ :** राम आला आहे ! माझा राम--

**कैकयी :** होय, तुमचा राम आला. तुम्हीच त्याला सांगायला हवं.

**दशरथ :** मी-मी कसं सांगू त्याला ? लोखंडाच्या तुकड्यासारखे शब्द माझ्या छातीत अडकताहेत. कैकयी, मी पुन्हा एकदा तुला विनंती करतो, माझ्यावर दया कर–तू सांगशील ते शासन मी भोगेन–उद्याचा समारंभ मी रद्द करीन–भरताला बोलावून घेईन–त्याला सिंहासनावर बसवीन–पण रामाला वनवासात–

**कैकयी :** जायलाच हवं. आणि तो आदेश तुम्हीच त्याला द्यायला हवा.

**दशरथ :** कैकयी ! राक्ष–

( राम येताना पाहून तोंड हाताने दाबतो आणि खाली मान घालतो. राम-सीता उत्साहाने प्रवेश करतात )

**राम :** भगवती, कौसल्यामातेला भेटण्यापूर्वी तुझ्या महालात आम्ही अगोदर आलो आहोत.

**सीता :** आपल्याला अभिवादन करण्यासाठी. सभामंडपात यज्ञविधीला आता प्रारंभ व्हायचा आहे–

**राम :** तुझे आशीर्वाद घेऊनच आम्ही जाणार आहोत तिकडे.

**कैकयी :** थांबा. कशासाठी माझा आशीर्वाद हवा आहे ?

**सीता :** भगवती–

**राम :** माते, आयुष्यातील प्रत्येक पावलासाठी, प्रत्येक क्षणासाठी तुझा आशीर्वाद हवा आहे मला, आणि जानकीलाही. आणि उद्या तर–

**कैकयी :** काय आहे उद्या ?

**सीता :** असं का विचारता, भगवती ? राजवाड्यात असून नसल्यासारखं ?

**राम :** उद्या ब्राह्म मुहूर्तावर राज्यारोहण समारंभ होणार आहे. पंचांगात नसलेली दिवाळी प्रजाजन साजरी करीत आहेत. देशोदेशीचे राजे वाद्यांच्या कल्लोळात आपल्या नगरामध्ये प्रवेश करीत आहेत. पुरोहितांचे मंत्रजागर जागोजाग चालू आहेत. राजधानीत सारं आकाश जयघोषांच्या शब्दांनी आणि लक्षावधी दिव्यांच्या प्रकाशानं ओथंबून गेलेलं आहे. आणि तुला माहीत नाही ?

**कैकयी :** माहीत असणं म्हणजे मान्य असणं नाही.

**राम :** काय म्हणायचंय तुला ?

**कैकयी :** अयोध्येत लक्षावधी दिवे पेटले असले तरी मी काळोखात आहे—नव्हे—या क्षणाला मी स्वतःच काळोख आहे.

**सीता :** आमच्या हातून काही अपराध झाला, भगवती ?

**राम :** झाला असेल तर आई—

**कैकयी :** तो शब्द उच्चारण्याचा अधिकार फक्त एकालाच आहे. माझ्या भरताला. ज्याचा जन्म माझ्या कुशीत झाला, त्याचीच मी आई. आणि तो या हर्षोत्सवापासून दूर आहे. नव्हे, त्याला मुद्दाम दूर ठेवण्यात आलं आहे.

**सीता :** असं होणार नाही.

**राम :** झालेलंही नाही. मंत्र्यांनी कैकेय राजाकडे दूत पाठवले होते, भरत-शत्रुघ्नांना आणायला. पण ते येऊ शकले नाहीत, असं समजलं मला.

**कैकयी :** साफ खोटं आहे ते. एका पापावर दुसऱ्या पापाचं आच्छादन. निरोप गेले नाहीत, आणि जाणारही नव्हते. विचार तुझ्या वडिलांना.

**राम :** ( दशरथाकडे वळून ) पिताजी, खरं आहे हे ?

**दशरथ :** हो.

**राम :** ( प्रक्षुब्ध ) पण का ? मंत्री माझ्याशी खोटं बोलले, कशासाठी ? या समारंभापासून दोघे भाऊ दूर आहेत, याची सर्वांत अधिक खंत मलाच वाटत होती. अजून वाटते आहे. का निरोप गेले नाहीत ?

**सीता :** ते कसं शक्य आहे, भगवती ? अमात्यांचा काही तरी गैरसमज झाला असला पाहिजे.

**कैकयी :** गैरसमज नाही—हे सगळं एक काळंकुट्ट, अधम कारस्थान आहे. आणि त्यात तूही सामील आहेस, रामा. कितीही साधुत्वाचा आव आणलास तरी.

**सीता :** भगवती, कुलदैवताची शपथ घेऊन सांगते, यांना त्यातलं काहीही माहीत नाही. माहीत असतं तर मलाही कळलं असतं.

**कैकयी :** राजघरातील कारस्थानं शेजघरात कधी पोचत नाहीत, जानकी.

**राम :** तू इतक्या कठोरपणानं का बोलतेस ? मी प्रांजलपणानं सांगतो, मला काहीच

समजत नाही, हे काय घडतंय ते.

**कैकयी :** अजून घडलं नाही. उद्या सकाळी घडणार आहे. दुसऱ्यासाठी पोसलेले पापाचे सर्प शेवटी आपल्याच गळ्याला विळखा घालतात, हे कळेल तुला.

**राम :** मी पाप केलं असेन, तर त्याचं प्रायश्चित्त घ्यायला मी कधीच नाही म्हणणार नाही. पण काय केलंय मी ?

**कैकयी :** सिंहासनावर बसायचा तुझा अधिकार नाही. आणि तू बसतो आहेस.

**सीता :** अधिकार नाही ?

**कैकयी :** कैकयीच्या मुलाला माझ्यानंतर राज्यावर बसवीन असं अभिवचन महाराजांनी माझ्या वडिलांना विवाहाच्या वेळी दिलं होतं, म्हणूनच आमचा विवाह झाला. ( दशरथाला ) सांगा, तुमच्या रामाला, वचन दिलं होतं की नाही.

**दशरथ :** हो–दिलं होतं.

**कैकयी :** मग त्या वचनाचं बंधन महाराजांवर आणि तुझ्यावर नाही ?

**राम :** माझ्यावर निश्चित आहे. पण पिताजी, मला हे तुम्ही अगोदर का सांगितलं नाही ?

**कैकयी :** असत्याचा आश्रय घेऊन, आपल्या लाडक्या मुलाला सिंहासनावर बसवायचं होतं म्हणून सांगितलं नाही.

**राम :** पिताजींचा मी लाडका असेन, तर त्याचा मला अभिमानच आहे. पण सत्याच्या आणि न्यायाच्या रक्तानं माखलेलं प्रेम, गंगेच्या तीर्थात कालकूट कालवावं तसं वाटेल मला.

**कैकयी :** आणि तरीही तू सिंहासनावर बसतो आहेस ?

**राम :** आता बसणार नाही. भगवती, मी मनापासून सांगतो, हे मला आधी कळलं असतं तर, मी स्वतः भरताला घेऊन आलो असतो आणि त्याला सिंहासनावर बसवून त्याच्या मस्तकावर चौऱ्या ढाळल्या असत्या. मला सिंहासनाची अभिलाषा नाही. केवळ पिताजींनी सांगितलं म्हणून—

**कैकयी :** त्यांची आज्ञा तू मानतोस—मानशील ?

**राम :** होय, वडिलांची आज्ञा म्हणजे ईश्वरवाक्य आहे, असं मी समजतो.

**कैकयी :** मग आता वडील काय आदेश देताहेत, तो ऐक. सांगा त्याला.

**दशरथ :** कैकयी—तू अजूनही—

**कैकयी :** तुम्ही सांगणार नसाल तर या क्षणी मी कपाळाचं कुंकू पुसून टाकीन आणि वाड्याबाहेर जाऊन सगळ्या नगराला ओरडून सांगेन की, दशरथाच्या राजवाड्यात सत्याचे खून झाले आहेत. सांगा—

**दशरथ :** रामा, उद्याचा राज्यारोहण समारंभ रद्द झाला आहे.

**राम :** मान्य आहे.

**दशरथ :** तू सिंहासनावर बसणार नाहीस.

**राम** : नाही बसणार.

**दशरथ** : आणि तू—तू—(ओरडतो) उद्यापासून चौदा वर्षे वनवासात जाणार आहेस.

( सीता अस्फुट किंकाळी फोडते. राम निश्चल उभा राहातो. क्षणभर स्तब्धता )

**राम** : ( खांद्यावर हात ठेवून ) जानकी, शांत राहा. रामाच्या सहचारिणीला असं दुःख शोभत नाही.

**कैकयी** : तुझ्या पित्याची आज्ञा तू ऐकली आहेस.

**राम** : होय. ऐकली आहे. पण हे शासन कशासाठी, एवढंच मला समजून घ्यायची इच्छा आहे.

**कैकयी** : अपराध तू केला असशील वा नसशीलही. पण वडलांच्या सिंहासनाप्रमाणेच त्यांच्या अपराधाचाही वारसा त्यांच्या लाडक्या मुलाला भोगावा लागतो. तुझ्या पित्यासाठी नरकाची कवाडं उघडावीत असं तुला वाटत नसेल तर त्यांचा हा आदेश विनशर्त मानायला हवा. त्यांनी मला वचन दिलं आहे.

**राम** : पिताजी, हा तुमचा निश्चित आदेश आहे ?

**दशरथ** : होय—आहे.

**राम** : ठीक आहे, मी तो मान्य करीत आहे.

**कैकयी** : उद्याच माध्यान्हापूर्वी तू वनवासाला निघणार आहेस.

**राम** : निघेन.

**कैकयी** : बरोबर कोठलीही संपत्ती, सेना अथवा सेवा घेणार नाहीस.

**राम** : नाही घेणार.

**सीता** : का-का इतका द्वेष ?

( दासी येते. )

**दासी** : भगवती, लक्ष्मणमहाराज.

**कैकयी** : येऊ दे, सर्वांना कळायला हवं.

( दासी जाते ).

**दशरथ** : होय, सर्व जगाला कळायला हवं की एखादा थेरडा बाप आपल्या मुलाच्या आयुष्यावर निखारे ठेवू शकतो–

**राम** : पिताजी, तुम्ही मुळीच दुःखी होऊ नका. तुमचे आशीर्वाद पाठीशी असल्यावर माझा वनवासही राजवाड्यातील निवासापेक्षा आधिक सुखावह आणि सार्थ होईल.

( लक्ष्मण येतो ).

**लक्ष्मण** : रामा, कौसल्यामाता तुझी वाट पाहाते आहे. मातांना प्रणाम करून सभागारातील यज्ञ तुला प्रज्वलित करायचा आहे. म्हणून तुला बोलावायला आलो मी–पण तू असा हरवल्यासारखा उभा का ? आणि सीतादेवी, पिताजी, तुम्हीही असे उध्वस्त झाल्यासारखे–काही अप्रिय घडलं आहे ? कोणीच का बोलत नाही ?

सीतादेवी, तू तरी सांग –

( सीता मानेनं नाही सांगते. )

**कैकयी :** मी सांगते. उद्याचा समारंभ होणार नाही.

**लक्ष्मण :** का ? एवढी सगळी सिद्धता झाल्यावर ? कोण अडवू शकणार आहे तो ?

**कैकयी :** मी. समारंभ होणार नाही आणि राम राज्यावर बसणार नाही.

**लक्ष्मण :** अस्सं !

**कैकयी :** एवढंच नाही. राम उद्या वनवासाला जाणार आहे चौदा वर्षं.

**लक्ष्मण :** पुन्हा त्या शब्दाचा उच्चार कर. तू माता असलीस तरी तुझ्या जिभेची खांडोळी करून टाकीन !

**राम :** लक्ष्मणा, मातेला दोष देण्याचं कारण नाही. हे सर्व निर्णय मी घेतले आहेत, आणि त्याची चर्चा या ठिकाणी होणार नाही.

**लक्ष्मण :** पिताजींची संमती आहे ?

**राम :** होय आहे.

**कैकयी :** संमती नव्हे, आदेश आहे.

**लक्ष्मण :** लक्षात आलंय् माझ्या. सवतीच्या मत्सराचा आणि सावत्राच्या द्वेषाचा हा नीच, अमानुष उद्रेक आहे. रामा, वडिलधाऱ्यांची बुद्धी चळली तर त्यांचे आदेश कस्पटासारखे केरकचऱ्यात फेकून दिले पाहिजेत.

**राम :** ( जरबेने ) मी पुन्हा सांगतो, हा विषय इथे संपला. हा निर्णय, ही प्रतिज्ञा माझी आहे. त्यात कालत्रयीही बदल होणार नाही. उद्या मी वनवासाला निघणार आहे.

**लक्ष्मण :** एकटा ?

**राम :** होय, एकटा.

**लक्ष्मण :** मग माझीही प्रतिज्ञा ऐक. राम एकटा जाणार नाही. जिथे राम तिथं लक्ष्मण. यातही कालत्रयी बदल होणार नाही. मीही तुझ्याबरोबर वनवासात येणार आहे.

**सीता :** आणि अर्थात् मीही.

**राम :** ठीक आहे–पिताजी, आपले आशीर्वाद मला हवे आहेत—

**दशरथ :** ( त्याला जवळ घेऊन ) जा-जा-माझ्या लाडक्यांनो–वनवासात जा–दैवाचा हा मला शाप आहे की हा प्रसंग उद्‌भवण्यापूर्वी मी मेलो नाही ! माझ्या म्हातारड्याची जी काही आयुष्यभरातली पुण्याई असेल ती सगळी तुम्हाला साथ करील. जा ! तुमच्या पायाखाली निखाऱ्यांचीही फुलं होतील—( कोसळतो. ).

पडदा

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

अयोध्येच्या शिवेवर असलेल्या देवालयाचे प्रांगण. मागील बाजूला उंचावर असलेले देवळाचे प्रवेशद्वार आणि तेथपर्यंत जाणाऱ्या पायऱ्या. वेळ सायंकाळची.

एक परिचारक पायऱ्यांच्या खाली उभा आहे.

शत्रुघ्न देवालयातून बाहेर येतो.

**शत्रुघ्न :** ( पायऱ्या उतरत ) अजून कोणीच आलं नाही ?

**परिचारक :** नाही, महाराज. कोणीही आलेलं नाही, शिंगतुताऱ्यांचे आवाजही ऐकू आले नाहीत.

**शत्रुघ्न :** ( खाली येऊन ) आश्चर्य आहे. आमच्या आगमनाची वार्ता देणारे अग्रदूत केव्हाच राजधानीला पोचले असणार. माझी कल्पना होती, अयोध्येच्या शिवेवर असलेलं हे शिवालय, भरताचं स्वागत करण्यासाठी आतुर झालेल्या संमर्दानं गजबजून गेलेलं असेल. पिताजी इतक्या दूरवर येतील अशी अपेक्षाच नाही. वात्सल्य कितीही गाढ असलं तरी त्याला वार्धक्याचा पायबंद असतो. पण राम लक्ष्मण, सुमंत ? आमचे मानकरी, आमचे महाजन, आमचे सचीव—कोणीच कसं नाही ? की वार्ताच पोचली नाही ?

**परिचारक :** शत्रुघ्न महाराज, तीन शक्यता मला वाटते. स्वार अयोध्येला उशिरा पोचले असतील किंवा अद्याप पोचलेही नसतील.

**शत्रुघ्न :** अशक्य ! सर्वस्वी अशक्य ! मागच्या तळावरूनच आमचे दूत मार्गस्थ झाले. वाऱ्याशी स्पर्धा करणाऱ्या अश्वांवर स्वार झालेले. एवढ्या अवधीत अयोध्येला चारदा जाऊन ते परत आले असते. आणि तसं अंतर तरी किती ! अवघ्या तीन कोसांचं–देवळाचा वहिवाटदारही देवळात नाही. मी दर्शनाला गेलो तेव्हा आत कोणीही नव्हतं. कोठे दिसला तो ?

**परिचारक :** होय, महाराज. देवळाच्या मागच्या ओवरीत भेटला मला तो.

**शत्रुघ्न :** काय म्हणाला ? काही निरोप आल्याचं सांगितलं त्यानं ?

**परिचारक :** मी त्याला अनेकदा विचारले. पण तो काहीच बोलला नाही. पुतळ्या सारखा निःशब्द होता. काही विचारलं की फक्त कपाळाला हात लावतो आणि आकाशाकडे पाहून नमस्कार करतो.

**शत्रुघ्न :** ही लक्षणं काही बरी दिसत नाहीत. ठीक—तू जा आता, सारं काही शुभ आणि मंगल असेल. मंगलाच्या दारावर पुष्कळदा अमंगलाचेच पहारे असतात. ( स्मित करून ) सारे मनाचे खेळ. तू जा आणि भरतमहाराजांना माझा सांगावा दे. म्हणावं, अयोध्येहून अद्याप कोणी आलेलं नाही पण पूर्वप्रथेनुसार या दैवताच दर्शन घेतल्याशिवाय आपल्याला पुढे जाता यायचं नाही. सहचरांना रथ सिद्ध करायला सांगा, आपण मात्र स्वतः इकडे या आणि महेश्वराचं दर्शन घ्या. थोडा वेळ वाट पाहू. कोणीच आलं नाही तर पुढे मार्गक्रमण करू. जा—सांग त्याना.

**परिचारक :** आज्ञा महाराज.

( जातो. )

**शत्रुघ्न :** बहुधा असंच असावं. आमच्या दूतांनाच अयोध्येला पोचायला उशीर झाला असेल. पुढे जाणाऱ्यांच्या मार्गाची कल्पना मागे राहणाऱ्यांना कधीच येत नाही. मागे राहणाऱ्यांना पुढे जाणाऱ्यांच्या वाटा नेहमी निर्वेध वाटत असतात.— हा देवळाचा पुजारी—( पायऱ्यांकडे जाऊन हाक मारतो. ) वहिवाटदार ! देवळाचे पुजारी —मी शत्रुघ्न बोलावतो आहे तुम्हाला—

( वरच्या बाजूला पुजारी – घाबरलेला–येऊन उभा राहतो —नमस्कार करतो. )

**शत्रुघ्न :** तुम्ही पुजारी आहात ?

**पुजारी :** ( होकारार्थी मान हलवतो. )

**शत्रुघ्न :** मी शत्रुघ्न आहे. राजपुत्र. आणि माझे थोरले बंधू भरतमहाराजही इथे आलेले आहेत.

**पुजारी :** ( पुन्हा मस्तक वाकवून नमस्कार करतो. )

**शत्रुघ्न :** तुम्ही देऊळ सोडून बाहेर का राहता ? देवळात उपस्थित राहणं तुमचं काम नाही ?

**पुजारी :** ( मान खाली घालतो. )

**शत्रुघ्न :** ठीक आहे. दोन वर्षे आम्ही दोघेही अयोध्येच्या बाहेर, आजोळी होतो. नगरातली वार्ता काय आहे ?

**पुजारी :** ( मान नकारार्थी हलवतो. )

**शत्रुघ्न :** तुम्हाला माहीत नाही ?

**पुजारी :** ( मानेने नाही सांगतो. )

**शत्रुघ्न :** तुम्ही नगरात कधी जात नाही ! इथेच राहता ?

**पुजारी :** ( होकारार्थी मान हलवतो. )

**शत्रुघ्न :** तुम्ही जात नसाल, पण राजधानीतील वार्ता तर येथपर्यंत येत असतील ? राजधानीत, राजवाड्यात सर्व काही कुशल आहे ना ? तुम्ही बोलत नाही ? बोलता येत नाही तुम्हाला ?

**पुजारी :** ( नकारार्थी मान हलवतो. )

**शत्रुघ्न :** मुके आहात ?

**पुजारी :** ( मानेने होय सांगतो. )

**शत्रुघ्न :** वाहवा ! देवाच्या नावाचा ज्याला उच्चार करता येत नाही, त्याला आमच्या मंत्र्यांनी पुजारी नेमलंय. पण तुम्हाला ऐकू येतंय् ?

**पुजारी :** ( खुणेने हो सांगतो )

**शत्रुघ्न :** मग मान हलवून उत्तर द्या. अयोध्येत सर्व काही क्षेम आहे ना ? हे पाहा. भरतमहाराज स्वतः इकडे येताहेत. त्यांनाही कळायलां हवं. आमचे परमपूज्य पिताजी राजाधिराज दशरथ महाराज, आमचे बंधू राम, लक्ष्मण, आमच्या माता–सर्वांचं कुशल आहे ना ?

( पुजारी किंकाळी फोडतो आणि मागील बाजूला धावत निघून जातो. )

**शत्रुघ्न :** पुजारी ! ( भरत येतो. )

**भरत :** अजून कोणी आले नाही ?

**शत्रुघ्न :** कोणीही नाही.

**भरत :** आता ओरडलं कोण ? कोणीतरी भयभीत होऊन ओरडल्याचा आवाज ऐकला मी.

**शत्रुघ्न :** देवळाचा पुजारी. मुकी माणसंसुद्धा इतकी आकाशभेदी किंकाळी फोडू शकतात हे आजच कळलं मला.

**भरत :** मुका आहे तो ?

**शत्रुघ्न :** असं म्हणतोय् तो, निदान दाखवतोय्.

**भरत :** तो तसं दाखवीत असला तर आपणही खरं मानायला हवं ते.

**शत्रुघ्न :** पण माझा प्रश्न ऐकून तो किंचाळला. मान हलवीत होता तेव्हादेखील त्याचे ओठ थरथरत होते. जिभेवर आलेले शब्द तो सायासानं गिळून टाकीत होता असं वाटत होतं.

**भरत :** जाऊ दे. अयोध्येत गेल्यावर त्याच्या किंकाळीच संशोधन करायला आपण राजवैद्यांना सांगू. पण अद्याप कोणीही आलं नाही याचं नवल वाटतं मला. याच देवळाच्या प्रांगणात येणाऱ्याची भेट घ्यावी असा प्रघात आहे आपला. मला

वाटतं शत्रुघ्ना, आपण आता अधिक वाट न पाहता मार्गक्रमण करावं. आपले सहकारीही आता अधीर झाले आहेत. गाव दूर असतं तेव्हा माणसं शांत असतात, जवळ आलं की अशांत होतात. खरं सांगायचं तर मीही अधीर झालो आहे. आई वडिलांच्या पायांवर आणि भावांच्या छातीवर हे डोकं केव्हा टेकेन असं झालंय मला. आई तर डोळ्यांचे दिवे करून माझी वाट पाहात असेल. मी शिवाचं दर्शन घेऊन येतो.

**शत्रुघ्न :** मी पुजाऱ्याला देवळात जायला सांगतो. ( वरती जातो ) भरता, रथाचा आवाज येतोय. ( पायऱ्या चढून बाहेर बघत ) होय–एक रथ वादळाच्या वेगानं या प्रांगणाकडे येतो आहे–कोणीतरी आलं आहे–पण फक्त एकच रथ–( भरत वरती येतो. ) महाजन नाहीत, मानकरी नाहीत, तुताऱ्या–भेरीही नाहीत–

**भरत :** रथ आपला आहे यात शंकाच नाही. राघवांचं निशाण त्याच्या अग्रावर फडकत आहे. प्रांगणापाशी थांबला तो–कोणीतरी उतरतंय.

**शत्रुघ्न :** आपले प्रधान सुमंत आहेत ते–एकटेच सुमंत-दोन वर्षांत आपलं बरंच अवमूल्यन झालेलं दिसतं–आत येताहेत ते—

( सुमंत–येतो. दोघे खाली येतात. )

**सुमंत :** राजपुत्रांना माझे प्रणाम. देवाच्या दयेनं आपला प्रवास सुखाचा झाला असेल.

**भरत :** होय, सुमंत, प्रवास सुखाचा झाला.

**शत्रुघ्न :** इथे येईपर्यंत. देवळात आल्यावर मात्र देवाची दया संपली आणि सुखाचं रूपांतर चिंतेत झालं.

**सुमंत :** चिंता ? कशाबद्दल ?

**भरत :** आपल्याला यायला इतका उशीर झाला म्हणून. आमचे दूत वेळेवर पोचले नाहीत ?

**सुमंत :** पोचले.

**भरत :** आणि तरीही–

**सुमंत :** उशीर झाला. कारण इथे सांगायला मी असमर्थ आहे. पण विलंबाबद्दल मी आपली क्षमा मागतो.

**भरत :** क्षमा मागायची गरज नाही. तसंच काही कारण असल्याशिवाय आपल्याला उशीर झाला नसेल, हे मी जाणतो. पण आपण एकटेच कसे आलात ? आपल्या-बरोबर कोणीच नाही.

**शत्रुघ्न :** ना मानकरी, ना महाजन, ना सचीव. असं स्वागत आम्हाला अपेक्षित नव्हतं–सुतकातून बाहेर ओढल्यासारखं.

**सुमंत :** त्याबद्दलही मी अधिक बोलू शकत नाही.

**भरत** : सुमंत, राजधानीत आणि राजवाड्यात सर्वांचं कुशल आहे ना ?

**सुमंत** : होय महाराज, सर्वांचं कुशल आहे. आपण आता निघायला हवं–मी आपल्या शिबिराला सिद्ध व्हायला सांगतो—

**भरत** : सर्वजण प्रयाणाला सिद्ध आहेत. आपण बरोबरच जाऊ. पण आम्ही नगर-शिवेत प्रवेश करताना, आमच्या मातापित्यांनी, आमच्या बंधूंनी, निदान आपले आशीर्वाद आमच्यासाठी पाठविले असतील.

**सुमंत** : होय, पाठविले आहेत. आपण दर्शन घेऊन आलात ?

**भरत** : नाही–मी देवालयात जाऊन येतो–नंतर आपण तात्काळ निघू–इथेच थांबा तुम्ही.

**सुमंत** : आपली इच्छा.

( भरत देवळात जातो. )

**शत्रुघ्न** : ( क्षणभरानंतर ) सुमंत महाशय, राजकारणात शत्रूंशी वेळप्रसंगी खोटं बोलावं लागतं. पण इथे राजकारण नाही आणि शत्रूही नाहीत. सम्राटांच्या पुत्रांशी तुम्ही बोलता आहात—

**सुमंत** : महाराज–

**शत्रुघ्न** : तुम्ही वडिलधारे आहात. तुमच्याशी कठोरपणानं बोलायला मला भाग पाडू नका. ( तीव्र स्वरात ) खरं सांगा. राजधानीत काय घडलंय् ते ?

**सुमंत** : काहीही घडलं नाही.

**शत्रुघ्न** : ( कठोरपणानं ) साफ खोटं. तुमच्या वडिलकीची बूज मी आता टेवणार नाही. तुम्ही खोटं बोलता आहात. आम्हाला पाहिल्याबरोबर पुजाऱ्याची वाणी हरवते आणि राजवाड्यातील कुशल विचारल्यावर तो भ्रमिष्टासारख्या किंकाळ्या फोडीत पळून जातो. आणि तुम्हीही–भरताला उत्तर देत असताना तुमच्याही मुद्रेवर असत्याचा काळाकुट्ट अंधार पसरलेला मला दिसत होता. भरताला कळलं नसेल, तो महात्मा आहे. पण तुमचा प्रत्येक शब्द खोटेपणानं माखलेला होता. ( ओरडतो ) सांगा, काय घडलंय् अयोध्येत ?

**सुमंत** : काहीही नाही.

**शत्रुघ्न** : ( क्रोधानं ) पुन्हा खोटं. आम्ही दोन वर्षे दूर राहिलो म्हणून हा अधिक्षेप ! वृद्धा, काय घडलंय् ते सांग–नाहीतर दशरथाच्या मुलाशी खोटं बोलणाऱ्याची जीभ...

( त्याचा हात ओढतो ).

**सुमंत** : ( पायावर कोसळतो ) खूप काही घडलंय्–पण मला आदेश आहे कैकयीमातेचा –मी आता काही सांगू शकत नाही–मला क्षमा करा–

पडदा

## प्रवेश दुसरा

कैकयीचा महाल.
वेळ रात्रीचा पहिला प्रहर.
कैकयी एकटी–समईच्या ज्योतीकडे पाहात बसलेली.
मंथरा येते.

**कैकयी :** अजूनही त्याला वेळ होत नाही इकडे यायला !

**मंथरा :** तेच सांगायला मी आले आहे. तुझी भेट घ्यायला भरत इकडे येतो आहे. प्रतिहारीनं मला आत' सांगितलं.

**कैकयी :** ( क्षणभराने ) मला भीती वाटते आहे, मंथरे. राजधानीत येऊन दोन दिवस झाले, पण मला तो भेटला नाही.

**मंथरा :** श्राद्धविधीत गुंतला होता तो. शिवाय राजसभेत निर्माण झालेले हजार प्रश्न. मंत्र्यांच्या आणि पुरोहितांच्या वेढ्यातून तो सुटूच शकला नसेल.

**कैकयी :** त्याचीच धास्ती वाटतेय मला. राजवाड्यातलं आणि नगरामधलं हे वातावरण. सहस्रावधी घुबडांचे थवे घराघरांवर आणि मनामनांवर उतरले आहेत, असं वाटतं.

**मंथरा :** कैकयी, आपण जे केलं आहे ते भरताच्या हितासाठीच केलंय. त्याला समजायला हवं ते.

**कैकयी :** देव करो आणि तसं होवो. कौसल्येच्या आणि सुमित्रेच्या महालात तो जाऊन आला असं ऐकलंय मी.

**मंथरा :** मीही ऐकलंय.

**कैकयी :** जहराचे घडे त्याच्या मनात ओतायला उभी राहिलेली ही माणसं—त्या सर्वांना तो भेटला. फक्त मलाच नाही.

**रेवती :** ( प्रवेश करून ) देवी, भरतमहाराज येत आहेत

**मंथरा :** मी जाते. कुळदेवतेचे आणि पिताजींचे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत, हे विसरू नकोस. आपला लाडका भरत वैऱ्यांच्या हाती जाणार नाही—मला खात्री वाटते – जाते मी.

( मंथरा जाते.

भरत येतो. आत येताच पुढे होऊन कैकयीच्या पायांना स्पर्श करून दूर उभा राहतो.

क्षणभर कोणीच बोलत नाही. )

**कैकयी :** कुशल आहेस ना ?

**भरत :** ( स्तब्ध )

**कैकयी :** आजोळी माणीजणं सुखात आहेत ना ?

**भरत :** ( स्तब्ध )

**कैकयी :** बोलत नाहीस ?

**भरत :** पाहतो आहे. ही काळी वस्त्रं तू कशासाठी परिधान केलीस—अमावास्ये-सारखी ?

**कैकयी :** तुला माहीत आहे, माझ्या राजा.

**भरत :** होय. माझा पिता आणि तुझा पती मरण पावला हे मला माहीत आहे. पण मानेवर वार करणाऱ्या तलवारीच्या पात्यावरून रक्त निथळत असतं. आसवं निथळत नाहीत.

**कैकयी :** म्हणजे तुला पुरतं माहीत नाही.

**भरत :** खूप माहीत आहे मला. मी वेशीतून आत प्रवेश केला, तेव्हा अंधार पडलेला असूनही, नगरपेठेत एकसुद्धा दिवा पेटलेला नव्हता. एरव्ही गर्दीनं ओथंबणाऱ्या रस्त्यावरून माणसंच काय, पण कुत्रीदेखील वावरत नव्हती. महाद्वारातून एखाद्या बीभत्स पापानं प्रवेश करावा त्याप्रमाणे, सौधातली आणि गवाक्षातील माणसं माझा रथ पाहताच, तोंडं फिरवून आत सरकत होती. तेव्हाच मला माहीत झालं. सुमंतांनी मला फक्त घटना सांगितल्या होत्या, नगरातल्या वातावरणानं मला इतिहास सांगितला. गंगाकाठी श्राद्धाचा विधी चालू असताना, गुरासारखे हाकारून आणलेले महाजन, मेलेलं जनावर कुरतडणाऱ्या गिधाडांकडे पाहावं, त्याप्रमाणे माझ्याकडे पाहात होते. मला पुष्कळ समजलंय. मी जवळ असेपर्यंत कावळेदेखील पिंडाला स्पर्श करायला पुढे येत नव्हते. मी दूर गेल्यावरच त्यांनी पिंडग्रहण केलं.

**कैकयी :** माझ्या बाळा, हे सारे तुझ्या मनाचे खेळ आहेत. नागरिकांचं, महाजनांचं, मानकऱ्यांचं तुझ्यावर असीम प्रेम आहे.

**भरत :** प्रेम होतं. रामाचा भाऊ म्हणून. पण ते आता जळून खाक झालंय. प्रत्येक माणसाच्या नजरेमध्ये त्याची धगधगीत, काळीकुट्ट राख मात्र मला दिसते आहे.

रामाच्या मागे पंचक्रोशीपर्यंत धाय मोकलीत गेलेल्या प्रजाजनांचा भरत हा आता वैरी झाला आहे – साता जन्मांचा. आणि हे तू केलं आहेस.

**कैकयी** : काय केलं मी? माझ्या पोटच्या मुलावर प्रेम करायचा मला अधिकार नाही?

**भरत** : मुलावर प्रेम करायचा अधिकार म्हणजे नवऱ्याला मारायचा अधिकार नाही. मुलावर प्रेम करायचा अधिकार म्हणजे सावत्र मुलांना वनवासात पाठवायचा अधिकार नाही. ( आवेगाने तिचे हात धरीत ) आई, तू हे काय करून ठेवलं आहेस आणि कशाकरिता?

**कैकयी** : भरता, लाडक्या, तू क्षणभर का होईना, माझा हात हातात घेतलास, मला स्पर्श केलास, सारं काही भरून पावले मी. चोळीची गाठ सोडून मी माझ्या लाडक्याला दूध पाजायला पहिल्यांदा जवळ घेतलं—कमलकळ्यांसारख्या ओठांचा तो स्पर्श–किती धन्यता वाटली होती मला. असं वाटलं की, स्वर्गातून खाली उतरणारी भागीरथी माझ्या स्तनांत तुडुंब भरली आहे, आणि तिचा उसळता आवेग माझ्या चिमुकल्याच्या ओठात, नव्हे त्याच्या अवघ्या जीवनात सरसरून ओतला जात आहे. बाळा, त्या स्पर्शासाठी मरावं आणि पुन्हा जन्माला यावं असं वाटलं होतं मला. तुला कधीच कळणार नाही, पण तू क्षणमात्र माझ्या हाताला केलेला स्पर्श – तशीच धन्यता वाटते आहे मला. सगळी नाती, सगळे संबंध, माझ्या मनावरून या क्षणी ओघळून पडले आहेत. फक्त तुझी आई म्हणून मी तुझ्या समोर उभी आहे. विचार मला हवं ते.

**भरत** : विचारू? माझ्या परमप्रिय पित्याच्या मृत्यूला तुझं वागणं, तुझं मागणं, कारणीभूत झालं. नाकारशील तू?

**कैकयी** : मुळीच नाही.

**भरत** : म्हणजे माझ्या पित्याचा मृत्यू तू घडवून आणलास. स्वतःच्या पतीचा. हे भयानक पाप तुझ्या कपाळावरून एखाद्या वटवाघळासारखं लोंबतं आहे. नाही म्हणशील?

**कैकयी** : नाही म्हणणार. पण पाप असलंच तर त्याचं वटवाघूळ माझ्या कपाळावरून लोंबलेलं नाही. तुला दूध पाजणाऱ्या माझ्या स्तनांवरून लोंबतंय् ते. माझे स्तन माझ्या पतीच्या मालकीचे होते. रंगमहालातल्या विलासासाठी. महाराजांच्या वृद्ध शृंगाराचा सारा उन्माद त्यांनी सुखानं सहन केला. पण तुझा जन्म झाल्यावर, ते स्तनच नव्हे, तर माझं सगळं जगणं तुझं आणि तुझ्यासाठी झालं. माझ्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणावर भरताच्या नावाचीच मुद्रा होती. नाकारशील तू?

**भरत** : तू आई आणि मी मुलगा हे नातं ईश्वराच्या इच्छेनंच निश्चित झालं. माझ्या दुर्दैवानं. ते मी नाकारू शकत नाही. तू माझ्यावर अलोट प्रेम केलंस हेही मी

नाकारीत नाही. पण मी फक्त तुझाच नाही आणि कधी नव्हतोही. जसा तुझा होतो तसाच माझ्या पित्याचाही होतो.

**कैकयी :** तसा, पण तितका नाही. तुझ्या पित्याला चार मुलं होती. मला तू एकटाच आहेस.

**भरत :** म्हणून तू माझ्या जीवनाची अशी राखरांगोळी करू शकत नाहीस.

**कैकयी :** राखरांगोळी केली मी ? अयोध्येचा राजमुकूट तुझ्या मस्तकावर चढणार आहे, रघुवंशाचं हे सार्वभौम सिंहासन तुझ्या मालकीचं होणार आहे, देशोदेशींचे सामंत तुला प्रणाम करण्यासाठी राजधानीत येणार आहेत. गजान्त लक्ष्मी आणि अफाट सत्ता मी तुझ्या पायाशी आणून ठेवली आहे. ही तुझ्या जीवनाची राखरांगोळी झाली !

**भरत :** लक्ष्मी काय, किंवा सत्ता काय, न्यायनीतीच्या राजमार्गानं, सूर्याचे आशीर्वाद घेत दाराशी आली तर ती साध्वी. पण ती आडमार्गानं, पापाच्या काळोखातून, मागल्या दाराशी येऊन उभी राहिली तर ती केवळ छिनाल वेश्या. असे लक्ष्मीधर आणि सत्ताधारी ज्या दिवशी अयोध्येच्या सिंहासनावर येतील, त्या दिवशी त्या सिंहासनाची किंमत, कुंटणखान्यातील पलंगाइतकीही राहाणार नाही. पित्याच्या हत्येनं आणि भावाच्या वनवासानं लांछित झालेल्या त्या सिंहासनाला मी स्पर्शसुद्धा करणार नाही, हे तुला कळायला हवं होतं.

**कैकयी :** तुझ्या बोलण्याचा अर्थ इतकाच आहे, भरता, की तुझा आणि माझा नाश करण्यासाठी मानकऱ्यांनी आणि पुरोहितांनी उभारलेल्या कारस्थानानं तुझाही बळी घेतला आहे. हे तू बोलत नाहीस, ते कारस्थान बोलतंय. दुर्भाग्य माझं. लांडग्याच्या हातात गवसलेल्या माझ्या पाडसाला मी माझं सर्वस्व पणाला लावून बाहेर काढायचा प्रयत्न करते आहे, आणि ते पाडस माझ्यासमोर उभं राहून त्या लांडग्याच्या भलाईचे गोडवे गाते आहे. मला शिव्याशाप देतंय. वैऱ्यांचं कारस्थान सफल झालं.

**भरत :** कसलं कारस्थान ! वसिष्ठ-विश्वामित्राच्या संस्कारांनी पावन झालेल्या या राजवाड्यात कारस्थानाची कल्पनाही प्रवेश करू शकत नाही.

**कैकयी :** तेच मी तुला सांगायचा प्रयत्न करते आहे. शांतपणानं ऐकशील ? ( क्षणभर स्तब्ध ) तुला या गोष्टी माहीत नाहीत. पण महाराजांशी माझा विवाह झाला तेव्हा महाराज यौवन ओलांडलेले वृद्ध होते, आणि मी होते यौवनाला स्पर्श करणारी कुमारिका. राजांनी मला मागणी घातली. आपली कन्या एका साम्राज्याची राणी होत आहे याचा मोह पिताजींना वाटला. त्यांनी संमती दिली. पण ती देतान त्यांनी एक अट घातली, माझ्या मुलीच्या पोटी जर पुत्र जन्माला आला तर अयोध्येच्या सिंहासनाचा तोच अधिकारी व्हायला हवा. ही अट महाराजांनी मान्य केली, आणि मगच आमचा विवाह झाला. रामाला राज्याभिषेक करताना य

अटीचं बंधन महाराजांवर नव्हतं का? की रघुवंशातील सम्राटांनी केवळ नव्हाळी-तल्या मुली आपल्या राणीवशात ओढण्यासाठी वाटेल ती अभिवचनं द्यायची, आणि नंतर प्रसंग येताच ती उकिरड्यावर फेकून द्यायची?

**भरत :** हे कोणाला माहीत आहे?

**कैकयी :** सर्वांना. मंत्र्यांना, पुरोहितांना आणि बहुधा कौसल्येलाही. अंधारात होतास फक्त तू आणि मीही. एका वृद्ध मंत्र्याकडून ही हकीगत मंथरेला कळली. मला समजलं तेव्हा मी संतापले. माझ्या मनावर माझा ताबा राहिला नाही, मी मान्य करते. पण अशी प्रतारणा सर्वांनी का म्हणून करावी? याला कपटकारस्थान म्हणत नाहीत? न्यायनीतीचा राजमार्ग हा होता की, माझ्यावर विश्वास ठेवून सर्व गोष्टी मला अगोदर सांगायच्या. आजोळाहून तुम्हाला बोलावून घेऊन तुम्हालाही ही वार्ता कळवायची. कोण नाही म्हणालं असतं? माझ्या सवतींप्रमाणे मी साधुत्वाचे मुखवटे तोंडावर घालून वावरत नाही. मला जाणीव आहे, मी मनस्विनी आहे, वादळासारखी उसळणारी आहे, वणव्यासारखी पेटणारी आहे. पण मी नाही म्हटलं असतं? राम आणि भरत यांच्यात मी कधीच भेद केला नव्हता. मातीनं माखलेला बाल रामाचा चेहरा मी माझ्या पदरानं शंभरदा पुसला आहे. हजार वेळा त्याच्या डोळ्यांतली आसवं पुसली आहेत. पोटच्या मुलाला बाजूला सारून या हातांनी त्याला भरवलेलं आहे. मी नाही म्हणाले असते? रामाचे पायपोस माथ्यावर घेऊन वावरणारा तू-तू नाही म्हणाला असतास? मग ही फसवाफसवी कशासाठी? अभिषेकाचे मंत्रजागर राजवाड्यावर गाजू लागले तेव्हा मला कळलं. समारंभासाठी मांडलिकांना आणि मानकऱ्यांना बोलावणी गेली. पण एका अक्षरानं कळवलं नाही, ते तुला आणि पिताजींना. दोन भाऊ परदेशी असताना, त्यांना अंधारात ठेवून हा राज्याभिषेकाचा महोत्सव? घरात जेवणावळ असली तर दाराशी जमलेल्या कुत्र्यांनादेखील मिष्टान्नाचे तुकडे घातले जातात. आणि इथे-सावत्र असूनही सख्ख्या भावांप्रमाणे वागणाऱ्या तुम्हा दोघांना मुद्दाम दूर ठेवलं जातं. माझ्या पित्याला-कैकेय राजालाही- कळवलं नाही. का? कारण कैकयीच्या मुलाला राज्याभिषेक करीन, असं अभिवचन त्यांना दिलं होतं म्हणून. हा सारा चोरीचा अन्यायाचा आणि विश्वासघाताचा मामला नाही? तुझ्या माझ्या वैऱ्यांनी रचलेलं हे कारस्थान नाही? मी वाघिणीसारखी चवताळले, सारं तारतम्य मी झुगारून दिलं-मला कबूल आहे. पण माझ्या डोळ्यांसमोर माझ्या वासराला मारण्यासाठी, पारध्यांचे तिरकामटे सज्ज झालेले असताना, मी स्वस्थ राहू? नाही, भरता, तू साधुत्वाच्या अखेर तळावर पोचला आहेस, मी सामान्यांच्या जगात जगते आहे. तू माझा मुलगा आहेस, आणि मी तुझी आई आहे हे एकच नातं मी आता ओळखते. इतर सर्वांसाठी, आणि सर्व नात्यांसाठी मी शून्य आहे-साक्षात् शून्य आहे

**भरत :** ठीक आहे, कैकयी—

**कैकयी :** कैकयी ?

**भरत :** होय. कैकयी. जे एकच एक नातं तू मानते आहेस, त्या नात्यावर मी तीलांजली देत आहे. पतिपत्नीचं नातं तोडता येत, त्याप्रमाणे आई-मुलाचं नातं तोडता येतं की नाही, याचा खल धर्मज्ञ करतील, पण मी या क्षणी ते तोडलेलं आहे. यापुढे तू माझी आई नाहीस. आणि मी तुझा मुलगा नाही.

**कैकयी :** भरता, हे सारं समजल्यावर सुद्धा ?

**भरत :** तुझं म्हणणं मी ऐकलं आहे. जे एकमेव नातं तू मानतेस, त्याच्या दृष्टीनं तुझं वागणं योग्य असेलही, पण हा भयानक उत्पात घडवून आणताना एक मूलभूत नातं तू विसरलीस. राजा हा आपल्या प्रजेचा पालक आणि विश्वस्त असतो. प्रथमतः आणि अखेरतः. हे संगमरवरी राजवाडे, त्या चतुरंग सेना, सोन्याचे किरीट, रत्नांचे अलंकार—हे सारं ऐश्वर्य म्हणजे प्रजेनं आपल्या पालकाला दिलेलं वेतन आणि रक्षण आहे. भरतानं काय, किंवा रामानं काय, ऐषआरामानं गाद्यागिरद्यांवर लोळण्यासाठी वाडवडिलांनी दिलेली ही जहागीर नाही. आणि म्हणून सामान्यांच्या घरातील योग्यायोग्यतेचे संकेत राजवाड्यात निकामी ठरतात. आपल्या मुलाच्या कल्याणासाठी, सवती-मत्सरानं काळवंडलेलं घर, एखाद्या स्त्रीनं गवताच्या गंजी-सारखं पेटवून द्यावं, हे राजवाड्याच्या बाहेर ठीक असेलही. पण राजवाड्यात नाही. राजाचं घर हे कौटुंबिक हिताहिताचे डावपेच खेळण्याचा आखाडा होऊ शकत नाही—कालत्रयीही नाही. राजाचं पहिलं नातं प्रजेशी असतं, पहिलं आणि प्रसंग आला तर शेवटचंही. प्रजेच्या हिताचा सवाल उभा राहिला तर तो कोणाचा पिता नाही, पुत्र नाही, भाऊ नाही, अथवा नवराही नाही. या राजाच्या व्रताशी त्याच्या परिवारातील प्रत्येक व्यक्ती बांधलेली असते प्रजेच्या हितावर खाजगी संबंधांना मात करू देणं, हे राजाच्या आणि त्याच्या आप्तांच्या जीवनातलं सर्वांत मोठं पाप आहे. या पापाला क्षमा नसते. तू हे पाप केलं आहेस, कैकयी. पिताजींनी काहीही चूक केली नाही. केवळ थोरलेपणामुळे नव्हे, तर ज्ञानाच्या, संस्काराच्या आणि अनुभवाच्या अधिकारानंही, राम हाच राजा व्हायला पात्र आहे, हा मानकऱ्यांचा, मांडलिकांचा आणि लक्षावधी प्रजाजनांचा निर्णय होता. लोकांचा रामावर विश्वास होता, त्यांना रामच हवा होता. खाजगीतल्या मागण्या बाजूला सारून पिताजींनी लोकांची इच्छा शिरोधार्य मानली. राजा राजासारखा वागला, पण त्याची पट्टराणी मात्र, एखाद्या जुगाऱ्याच्या भांडखोर घरातील कंजारणीसारखी वागली राम लोकांना किती हवा होता हे पाहायचं असेल तर मेण्यात बैस आणि नगरातून फिरून ये. लोकांचा सारा आनंद, सारं चैतन्य, रामाच्या मागोमाग वनवासात गेलेलं आहे हे कळून येईल तुला. पुत्राच्या प्रेमामाठी तू प्रजेचा द्रोह केला आहेस. हे राणीला क्षम्य

नाही. पिताजींचा मृत्यू लोकांनी सहन केला असता. एक अटळ घटना म्हणून. पण रामाचा वनवास त्यांना सहन झालेला नाही. साऱ्या राजधानीचं एक प्रचंड प्रेत झालेलं आहे. हे तू घडवून आणलं आहेस.

( अस्ताव्यस्त झालेल्या मंथरेला पुढे ढकलून शत्रुघ्न आत येतो. पाठोपाठ दोन रक्षकही येतात. मंथरा कैकयीच्या पायापाशी जाऊन पडते. )

**शत्रुघ्न :** सारं कारस्थान या अवदसेचं आहे ! तिचंच जास्त. भरता, राजवाड्यातील सर्व घटना मला समजल्या आहेत. हा सर्व अनर्थ या कैदाशिणीनं घडवून आणला आहे. ( रक्षकांना ) मारा आसुडाचे फटकारे—ओढा तिला—

**मंथरा :** ( किंकाळत ) कैकयी ! भरता ! माझ्या लाडक्या !

**शत्रुघ्न :** ओढा तिला. तिच्या फक्त किंकाळ्या ऐकेन मी. शब्द ऐकणार नाही. मारा आसूड आणि घेऊन जा बंदीखान्यात. ( रक्षक पुढे होतात. )

**कैकयी :** मागे व्हा. खबरदार तिच्या अंगाला स्पर्श कराल तर !

**शत्रुघ्न :** भगवती, तुम्ही—

**कैकयी :** होय, मीच सांगते आहे. तिनं काहीही केलेलं नाही. जे घडलं त्याची जबाबदारी माझ्यावर आणि फक्त माझ्यावर आहे. जे घडलं ते तिनं सांगितलं म्हणून घडलेलं नाही, मी ते मानलं म्हणून घडलेलं आहे–ऊठ मंथरे, सत्तेच्या व्यवहारात माणसाच्या प्रेमाला जागा नसते, हे तुला कळायचं नाही मलाही आताच कळलंय् ते. शत्रुघ्ना, सिंहासन अजून रिकामं आहे. आणि ते रिकामं आहे तोपर्यंत या राजवाड्यात महाराजांच्या पट्टराणीचा अधिकार अबाधित आहे. काय शासन करायचं असेल ते मला करा. पण मंथरेच्या केसालाही धक्का लागलेला मला चालणार नाही.

**शत्रुघ्न :** पट्टराणीचा अधिकार तिच्या महालापुरता. तो राजवाड्यात चालणार नाही. मी चालू देणार नाही. राजा संपला तेव्हाच राणीही संपली–ओढा त्या अवदसेला–

**कैकयी :** माझ्या प्रेतावरूनच तुम्हाला पुढे जावं लागेल.

**भरत :** रक्षकांनो, मागे व्हा. शत्रुघ्ना, मी मंथरेला अभय देत आहे. कैकयीचं म्हणणं खरं आहे. दोष ठिणगी पाडणाऱ्याचा नसतो, त्या अग्नीनं वास्तूला आग लावणाऱ्याचा असतो. मंथरे, जा तू. आईपेक्षाही अधिक जिव्हाळ्यानं तू माझा सांभाळ केला आहेस, तुझ्या कडेखांद्यावर मी वाढलो आहे. मी इतकंच म्हणेन, तू हे करायला नको होतंस. पण राज्यासंबंधीची पट्टराणीची जबाबदारी तुझ्या शिरावर नाही. म्हणून तू मुक्त आहेस. रघुवंशाच्या इतिहासात तुझा चांगुलपणा जिरून जाईल आणि जगात अंधार पेरणारी एक अमावास्या म्हणून तुझी दुष्कीर्ती नोंदवली जाईल. एवढंच शासन तुला पुरे आहे. तू यापुढे राजवाड्यात राहायचं नाही. राजधानीत राहा किंवा इच्छा असेल तर स्वदेशी प्रयाण कर. ती व्यवस्था करण्याचा आदेश मी मंत्र्यांना देईन. शत्रुघ्ना, तिला घेऊन जा आणि मी सांगितल्या-

प्रमाणे सर्व व्यवस्था कर. त्यात कसूर होता कामा नये.

**शत्रुघ्न :** तुझी आज्ञा.

( शत्रुघ्न आणि रक्षक मंथरेला घेऊन जातात. )

( क्षणभर स्तब्धता. )

**कैकयी :** दासीच्या बाबतीत तू उदार झालास, आईच्या बाबतीत होऊ शकला नाहीस

**भरत :** जी माणसं उच्च पदावर असतात त्यांनी क्षमेची सवलत गमावलेली असते. राजसत्ता हे स्वार्थाचं साधन आहे असं मानून अत्याचारांची रास रचणाऱ्या शेन राजाला, लोकांनी दगडांनी ठेचून मारलं. त्याच्या जुलमात सहभागी असलेल्या कारभाऱ्यांचा बळी त्यांनी घेतला नाही. चांगलं करायची सत्ता ज्याच्याजवळ आहे, त्याचं वाईट करणं कधीच क्षम्य नसतं. आणि तरीही, राज्याचा नियंत्रक म्हणून मी तुला काहीही शासन केलेलं नाही, करणारही नाही. तू राजवाड्यात राहशील, विधवा राणी म्हणून पूर्ववत् सन्मानानं राहाशील. फक्त तुझं आईपण मी फेकून दिलेलं आहे. हे शासन तुला आहे, तसं मलाही आहे. ठीक आहे, आई. आई म्हणून... तुला ही शेवटचीच हाक मी घालीत आहे. तुझं आईपण संपलं. यापुढे हा शब्द माझ्या तोंडातून कधी निघणार नाही आणि तुझ्या महालातही मी कधी येणार नाही. ( जातो. )

**कैकयी :** ( असह्य आवेगाने ) माझं आईपण संपलं. यापेक्षा भयानक शिक्षा कोणती असू शकेल, माझ्या लाडक्या !

( कोचावर कोसळते. )

पडदा

## प्रवेश तिसरा

गुहकाचा वाडा.

बाहेरचे दालन.

अलीकडील बाजूस एक छोटा चौथरा—वाड्याबाहेरील चौकाच्या अंगास असलेला. आतल्या बाजूला आसने. दोन मोठ्या, उंच समया. —वेळ रात्रीची.

आतील दालनात अंधार आहे. चौथरा प्रकाशित वाड्याच्या बाहेरील चौकातून धीवरांच्या नाचगाण्याचे आवाज ऐकू येत आहेत.

आवाज टिपेला पोचत असता, दवंडीवाला आतून येतो, चौथऱ्यावर उभा राहून घंटा वाजवतो.

**दवंडी :** ऐका ! धीवर नागरिकांनो, पूजेसाठी राजाज्ञेनं सुरू असलेला हा नाचगाण्याचा उत्सव तावडतोब बंद करा. ( घंटा वाजवतो ) धीवराधिपती गुहक राजाचा हा आदेश आहे-तावडतोब नाचगाणं बंद करा ! ( आवाज थांबतात ). सारेजण चौकात या आणि आसनस्थ व्हा. आपल्या राज्यावर संकट आलेलं आहे. महाराज त्यासंबंधी आपल्याशी बोलणार आहेत. सर्वांनी शांतपणे आसनस्थ व्हावं—आपल्या परमप्रिय गुहक महाराजांची स्वारी येत आहे. सावधान-धीवराधिपती गुहक-महाराजांचा जयजयकार असो.

( बाहेरील नागरिक जयघोष करतात. दालनाच्या आतील दारातून चार मशालधारी शिपायांसह गुहक प्रवेश करतो. चौथऱ्यावर येऊन उभा राहतो. शिपाई मागे होतात. गुहक – वयोवृद्ध पण धिप्पाड कणखर बांध्याचा. )

**गुहक :** माझ्या धीवर बांधवांनो, चंद्रपूजेचा नृत्योत्सव तुम्हाला थांबवावा लागला याबद्दल मी दिलगीर आहे. पण आपल्या गावाच्या शिवेवरती एक संकट येऊन

ठेपलेलं आहे. संकटाचं स्वरूप अद्याप स्पष्ट झालेलं नाही. पण आपण त्याचा प्रतिकार करायला तयार व्हायला पाहिजे. गावशिवेवर अकस्मात येऊन ठेपलेलं सैन्य अयोध्येचं आहे. आपण वेशीवर जाऊन उत्तरेकडे पाहाल, तर पेटलेल्या पलित्यांचे एक प्रचंड जंगल आपल्या नजरेला पडेल. आपण अयोध्येचे मित्र आणि मांडलिक आहोत. अयोध्येच्या सेनेला ती कोठेही जात असली तरी सहाय्य करणं हे आपलं कर्तव्य आहे. मान्य ?

**जमाव** : होय – मान्य !

**गुहक** : पण अयोध्येचं सिंहासन अजून रिकामं आहे. राजवाड्यातील कारस्थानामुळे, आपणा सर्वांना प्रिय आणि वंदनीय असलेला राम आपल्याच सहाय्यानं गंगानदी ओलांडून वनवासाला गेला आहे. लक्ष्मण-सीतेसह. ज्याचा सिंहासनावर रास्त अधिकार तो सत्यशील राम रानावनांतून वाट काढतो आहे, झाडांच्या सावलीत राहतो आहे, कंदमुळं खाऊन निर्वाह करतो आहे; आणि सत्तेच्या अभिलाषेनं ग्रस्त झालेला त्याचा सावत्र भाऊ अयोध्येचं सैन्य घेऊन आपल्या दाराशी येऊन उभा राहिला आहे.

**जमाव** : का ! कशासाठी ?

**गुहक** : ते मीही शोधतो आहे, पण मला कळलंय् ते असं की, आपलं सिंहासन निर्वेध व्हावं म्हणून रामाचा संपूर्ण नाश करण्यासाठी, भरत गंगा ओलांडून चित्रकूटाकडे जात आहे. मित्रहो, उद्या रामामध्ये आणि भरतामध्ये, नीतीमध्ये आणि दहशतीमध्ये, धर्मात आणि अधर्मात, जर युद्ध सुरू झालं तर आपण सर्व—

**जमाव** : आम्ही रामाचे ! राम चिरायू होवो !

**गुहक** : धन्यवाद राम हा आमचा परमप्रिय सखा आणि नेता आहे. रामानंच शंभर वेळा सांगितलं म्हणून त्याचा वनवास आम्ही सहन केला. जिच्या चरणखालीला मखमली गालिचाचाच सराव होता, त्या जानकीनं जंगलातील काटेकुटे तुडवीत जावं—हेही आम्ही मान्य केलं. लक्ष्मणानं सत्तेवर, सुखावर आणि संसारावर तिलांजली देऊन निःसंगपणानं भावाला साथसोबत करावी; आणि या तिघांनीही आपल्या तारुण्यातील चौदा वर्षांची, सवतीमत्सराच्या होमात आहुती द्यावी—हे सारं काही, केवळ रामाची आज्ञा म्हणून आम्ही संमत केलं. पण आता वनवासात गेलेल्या रामाचाही नाश करण्यासाठी कैकयीचा पुत्र पुढे सरसावणार असेल, तर आपण स्वस्थ, शांत बसणार आहोत !'

**जमाव** : नाही–कधीही नाही !

**गुहक** : माझाही हाच निर्धार आहे. आपलं सैन्य शस्त्रसिद्ध आणि लढाईच्या पवित्र्यात उभं आहे. पण ही जबाबदारी केवळ माझी अथवा सैन्याची नाही. रामाचं रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. कैकयीच्या मुलानं सोन्यामोत्यांच्य

राशी देऊ केल्या तरी कोणाही धीवरानं आपली नाव प्रवाहात घालता कामा नये.

**जमाव** : नाही—नाही !

**गुहक** : हेच अभिवचन मित्रांनो, मला हवं होतं. आपल्या मदतीशिवाय अयोध्येचा एकही सैनिक गंगेच्या पैलतीरावर जाऊ शकणार नाही.

( दूत प्रवेश करतो. ).

**दूत** : ( प्रणाम करून ) महाराज, अयोध्येच्या शिबिरातून भरतराजे शत्रुघ्न-सुमंतासह आपल्याला भेटायला आले आहेत.

**गुहक** : भेटायला आले आहेत ? कोणतीही सूचना न देता ? आणि बरोबर – ?

**दूत** : चार मार्गदर्शक स्वारांशिवाय इतर कोणीही नाही. आताच ते रथातून उतरत आहेत.

**गुहक** : ठीक आहे. मी येतो तिकडे. या दालनातील सर्व समया पेटवायला सांग— ( जमावाला ) मित्रहो, उद्या कोणता प्रसंग आपल्यावर येणार आहे याचा निर्णय थोड्याच अवधीत होणार आहे. तोवर आपण विश्रांती घ्यावी. निर्णय झाला की मी तो आपल्यासमोर तावडतोब जाहीर करीन. धन्यवाद.

( मशालजींबरोबर बाहेर जातो.
जमाव गंगामाईचा जयघोष करीत विसर्जित होतो.
एक सेवक येऊन आतील दालनातील समया पेटवतो.
दालन प्रकाशित होते.
महाद्वाराजवळ शिंगांचा आवाज होतो.
गुहक, भरत, शत्रुघ्न आणि सुमंत आत येतात ).

**गुहक** : मला अगोदर सूचना मिळाली असती तर राजपुत्रांचं स्वागत मी अधिक चांगलं करू शकलो असतो. कृपया आपण आसनस्थ व्हावं.

**भरत** : गुहक, अयोध्येतील घडामोडी तुझ्या कानावर आल्या असतील. औपचारिक स्वागत स्वीकारण्याच्या मनःस्थितीत आम्ही नाही, आणि तेवढा आम्हाला अवसरही नाही. आम्हाला शिबिरातही विनाविलंब परत जायला पाहिजे.

**गुहक** : मी आपली काय सेवा करू शकतो ?

**सुमंत** : उद्या सकाळी सूर्योदयाबरोबर आम्हाला गंगानदी ओलांडून पलीकडे जायचं आहे. सर्व सेनेसह आणि सरंजामासह.

**शत्रुघ्न** : आणि त्यासाठी सूर्योदयाच्या अगोदर, तुझ्या नौकादलातील किमान तीनशे नौका, सैन्यांची वाहतूक करण्यासाठी सिद्ध असायला हव्यात. हा आदेश आहे आमचा

**गुहक** : क्षमा करा. अयोध्येच्या सिंहासनाचा स्वामी अजून ठरायचा आहे. आम्ही सिंहासनावर बसलेल्यांचे आदेश पाळतो, बसू पाहणाऱ्यांचे नाही.

**शत्रुघ्न** : याचा अर्थ ?

**गुहक** : अर्थ स्पष्ट आहे. माझी एकही नौका आपल्यासाठी गंगेच्या प्रवाहात प्रवेश करणार नाही.

**भरत** : गुहका, तू अयोध्येचा एक निष्ठावंत मांडलिक आहेत, हे विसरू नकोस.

**सुमंत** : मांडलिक आहेस आणि करारबद्ध आहेस. अयोध्येच्या सैन्याला सहाय्य करण्याचं तुझ्यावर बंधन आहे.

**शत्रुघ्न** : त्या अटीवरच गंगातीरावरील या प्रांताचं आधिपत्य तुम्हा धीवरांकडे देण्यात आलेलं आहे.

**गुहक** : यात धीवरांवर कोणी उपकार केलेले नाहीत. ब्राह्मणांनी पाठशाळा चालवाव्यात आणि क्षत्रियांनी घोडे चालवावेत. नौका चालविण्याची ताकद देवानं धीवरांनाच दिली आहे. आणि करारांचं म्हणाल तर आम्ही काळजाचे करार मानतो, शब्दांचे मानीत नाही. गंगानदी ओलांडून राम ज्या दिवशी पलीकडे गेला त्या दिवशी अयोध्येशी असलेले आमचे करार संपले. आम्ही आपल्याला मदत करणार नाही.

**शत्रुघ्न** : हा प्रश्न तुझ्या इच्छेचा नाही, गुहका. तुझं पिढीजात कर्तव्य करायला जर नकार दिलास, तर लक्षात ठेव, अयोध्येची विश्वविजयी सेना आमच्या आदेशाच्या पाठीशी आहे. एका रात्रीत, नव्हे, एका घटकेत, तुझा राजवाडा, तुझी राजधानी आणि तुझी राजसत्ता आम्ही बेचिराख करू शकतो.

**गुहक** : आपण जरूर प्रयत्न करा. पंचमहाभूतांशी अहोरात्र संग्राम करणाऱ्या धीवरांनी माणसांचं आणि त्यांच्या हत्यारांचं भय कधी बाळगलेलं नाही. गंगामाईचे पुत्र जमिनीवरही कसे लढतात हे आपणाला पाहायचं असेल तर फुंका रणशिंग ! वाजवा नौबती ! मी तयार आहे.

**भरत** : गुहका, हा अनपेक्षित वैरभाव कशासाठी ? तू पिताजींचा वडीलधारा मित्र आहेस. तुझे आशीर्वाद आणि सहाय्य मागण्यासाठी आम्ही आलो आहोत, आणि तू संग्रामाची भाषा करतोस ! अयोध्येच्या राजसत्तेनं तुझा कोणता अपराध केला आहे ?

**गुहक** : अपराध माझा केला असता तर तो मी क्षम्य मानला असता. पण साऱ्या दुनियेला सूर्याप्रमाणे प्रकाश देणाऱ्या रामाचा अपराध मी क्षम्य समजत नाही.

**भरत** : रामाच्या भेटीला जाणं म्हणजे रामाचा अपराध करणं आहे ?

**गुहक** : बगळे तलावाकडे जातात ते माशांची भेट घेण्यासाठीच. गुहकाच्या प्रेतावर पाय ठेवूनच रामाचा संहार करण्याची आपली आकांक्षा पुरी होऊ शकेल.

**भरत** : कोण रामाचा संहार करतंय ?

**गुहक** : कैकयीचा मुलगा.

**भरत** : कैकयींचा मुलगा म्हणजे कैकयी नव्हे. गुहका, तुझा गैरसमज झालेला आहे.

२३३३८ १५/५.८९ ...

आम्ही रामाचा नाश करायला निघालो आहोत, ही वार्ता तुला कोणी सांगितली?

**गुहक :** माझ्या दूतांनी.

**भरत :** आणि तू विश्वास ठेवलास?

**गुहक :** विश्वास ठेवला आणि अजूनही ठेवतो. राजकुमारा, तू रामाच्या भेटीची भाषा बोलतो आहेस. पण तुझ्याबरोबर आलेलं हजारोंचं सैन्य वेगळी भाषा बोलतंय्. अरण्यात एकाकी गेलेल्या रामाची भेट घेण्यासाठी अयोध्येची विश्वविजयी सेना बरोबर घ्यावी लागते? तुम्हाला माहीत आहे. रामाच्या रक्षणासाठी, माझ्यासारखे अनेक सामंत आपल्या सर्व शक्तीनिशी त्याच्याशेजारी उभे राहातील. आणि म्हणून ही तयारी.

**भरत :** गुहका, या शंकांचा खुलासा आधी विचारला असतास तर एवढा बखेडा झालाच नसता. मी परमेश्वराला आणि पिताजींच्या पायांना स्मरून सांगतो की रामाची भेट घेण्यासाठीच आम्ही निघालो आहोत.

**गुहक :** आणि सैन्य कशासाठी?

**भरत :** सैन्य बरोबर घेतलंय ते लढण्यासाठी नाही, तर रामाला अयोध्येचा स्वामी म्हणून सन्मानानं परत आणण्यासाठी. वल्कलं नेसून, अनवाणी पायांनी वनात गेलेला राम, सम्राटाच्या ऐश्वर्यासह आणि शक्तीसह राजधानीच्या वेशीतून, इंद्रासारखा मिरवत आला पाहिजे, अशी आमची भावना आहे. आणि राज्याच्या सीमेबाहेर, वनवासी प्रदेशातून जाताना, बरोबर सैन्य असणं हितावह असतं, हे तुझ्यासारख्या वृद्धाला सांगण्याची गरज नाही. एवढ्यासाठी हा सरंजाम. माझ्या शब्दावर अजूनही तुझा विश्वास बसत नसेल तर, माझ्याबरोबरोबर महामुनी वसिष्ठ आलेले आहेत. सुमंतांना पाठवून मी त्यांना इथे बोलावून घेतो. सत्याला प्रदक्षिणा घालण्याची गरज राज्यकर्त्यांना असू शकते, त्यांच्यासारखा तपस्वी फक्त सत्याचाच उच्चार आणि स्वीकार करू शकतो. तेही तुला तेच सांगतील. आणि तरीही तुझ्या मनात शंकेचा थोडाही सल राहणार असेल तर, शत्रुघ्नासह सर्व सरंजाम उद्या सकाळी गंगेच्या पैलतीरावर नेण्याची तू तरतूद कर, मी निःशस्त्र होऊन तुझ्या कारागृहात ओलीस म्हणून राहीन. माझ्या भावाकडून वा सैनिकांकडून रामाच्या अंगाला थोडी जरी दुखापत झाल्याचं तुला कळलं, तर त्या क्षणी तू माझा शिरच्छेद कर. हे देखील राघवांच्या कुलदेवतेला साक्ष ठेवून मी सांगतो आहे—

**गुहक :** ( रुद्ध स्वरात ) भरता, राजपुत्रा, माझी शंका फिटली, तू रामाचा भाऊ आहेस हे मी विसरलो, तू कैकयीचा मुलगा आहेस एवढंच मी लक्षात घेतलं. मला क्षमा कर. ( भरताला मिठीत घेतो. )

**भरत :** ( गुहकाच्या पायाला स्पर्श करून ) गुहका, तुझं रामावरचं प्रेम पाहून मी

आनंदित झालो आहे. एकाच प्रकाशाच्या दिशेनं जाणारे आपण सहयात्री आहोत. तुझे वडीलधारे आशीर्वाद मला हवे आहेत, पुढील प्रवासासाठी.

( शत्रुघ्न, सुमंतही अभिवादन करतात. )

**गुहक :** तुमचा सर्व प्रवास निर्विघ्न आणि सफल होवो—

( दूत येतो. )

**गुहक :** चूडामणी, आताच्या आता सर्व नाविकांना आणि सैनिकांना माझा आदेश कळव—आपलं सर्व नौकादल उद्या पहाटे, पहाटतारा मावळायच्या आत, गंगेच्या तीरावर सज्ज राहायला हवं—बाहेर गर्दी जमली आहे ?

**दूत :** होय, आपण त्यांना—

**गुहक :** मीच सांगतो – ( चौथऱ्यावर येतो ).

धीवर नागरिकांनो, शिवेवर आलेलं सैन्य आपल्या मित्रांचं आहे. अयोध्येचे राजपुत्र रामाला भेटण्यासाठी आणि त्याला अयोध्येला परत आणण्यासाठी सेनेसह पलीकडे जात आहेत. सर्व नागरिकांनी सेनेचं, सैनिकांचं, मानकऱ्यांचं स्वागत करावं आणि त्यांना सहाय्य करावं. तुमचा, माझा राम सुरक्षित आहे. पुन्हा अयोध्येला परत येत आहे. धन्यवाद.

( जमावाकडून रामाच्या जयघोषाच्या घोषणा. )

पडदा

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

चित्रकुटावरील पर्णकुटीचे अंगण
झाडांच्या बुंध्यांनी आणि फळ्यांची तयार केलेली काही आसने.
मागील बाजूला झाडी, खाली–दरीकडे जाणारी पायवाट.
वेळ : सकाळची.
सीता आणि तिची सखी मल्लिका फुलांचे हार गुंफीत आहेत.

**सीता :** झाले का तुझे हार गुंफून ?

**मल्लिका :** हो—होत आले. एक झाला, आता हा दुसराही पुरा होत आला. तुमचा ?

**सीता :** माझाही होत आलाय्. बघ किती छान झालाय्.

**मल्लिका :** किती सुंदर ! चार हारांची फुलं एका हारात गुंफली आहेत तुम्ही. . .बाई, एक विचारू का ?

**सीता :** ( हसते ) विचार की. मी काही इथे अयोध्येच्या राजवाड्यात नाही, चित्रकुटावरील झोपडीत आहे. राजवाड्यातले रिवाज वेगळे, झोपडीतले वेगळे. विचार–परवानगी कशाला हवी आहे ?

**मल्लिका :** रोज आपण दोनच हार करतो. एक तळ्यावरच्या देवीसाठी, आणि दुसरा केतकीवनातील शिवासाठी. आज तुम्ही स्वतः वनात जाऊन फुलं गोळा केलीत, काट्याकुट्यांतून, झाडाझुडपांतून, या तिसऱ्या हारासाठी. कोणासाठी आहे तो ?

**सीता :** ( स्मित करीत ) आज मला आणखी एक देव सापडला आहे.

**मल्लिका :** आज सापडला ?

**सीता :** सापडला पूर्वीच, पण आज त्याला हार घालायचाय्.

**मल्लिका :** नवल आहे. तुम्ही तर कालपरवा इथं आलात. आम्ही इतकी वर्षे राहतो आहोत. पण हा तिसरा देव आम्हाला कधी सापडला नाही. कुठे आहे तो ? या इकडच्या पहाडावर ?

**सीता :** ( हसत ) खरी आश्रमकन्या आहेस तू, मल्लिके ! प्रभासमुनींनी अजून तुझ्या लग्नाचं मनावर घेतलं नाही ?

**मल्लिका :** काही तरीच.

**सीता :** काही तरीच काय ? कुणातरी भाग्यवंताचा संसार आता साजरा करायला हवास तू.

**मल्लिका :** मी बोलणारच नाही.

**सीता :** नको बोलू. मी मुनींनाच विचारीन.

**मल्लिका :** ( घाबरून ) नको नको ! बाबांशी बोलायचं नाही मुळीच. शपथ आहे माझी.

**सीता :** अस्सं. म्हणजे आमच्या या चांदणीला आपला चंद्र सापडला आहे. कोण आहे तो भाग्यवान ?

**मल्लिका :** नाही–तसं काही नाही...

**सीता :** मल्लिके, राम मिथिलेला प्रथमतः आले ना, तेव्हाच मी पाहिलं त्यांना; आणि त्या क्षणी मी मनाशी ठरवलं, मंडपातला पण कोणीही जिंको, मी माळ घालणार ती या राजपुत्राच्या गळ्यामध्ये. माझी चलबिचल पाहून सख्या विचारायच्या, तेव्हा मीही असंच सांगायची–नाही–तसं काहीही नाही. तसंच हे ना ?

**मल्लिका :** नाही, तसं काही नाही.

**सीता :** इथे जवळ आरसा नाही. नाहीतर तुला दाखवला असता. हे शब्द बोलताना तुझे गाल किती लाल झाले आहेत !

**मल्लिका :** खरंच ? ( पुसायला लागते )

**सीता :** वेडाबाई ! गालाची लाली अशी हातानं पुसली जाते ? ती काढायचे वा वाढवायचे वेगळेच मार्ग असतात. बघ, गालावरची कमलं अधिक फुलायला लागली. म्हणजे ते मार्ग माहीत आहेत आमच्या वनकन्येला.

**मल्लिका :** ( कासावीस होऊन ) बाई !

**सीता :** मल्लिके, मी काही नुसती गंमत म्हणून किंवा कुतूहल म्हणून विचारीत नाही. आम्ही प्रवासी आहोत. या चित्रकूटावर आज आहोत, उद्या, नसूही. इथे आहोत तोपर्यंत माझ्या सखीच्या गळ्यात मंगळसूत्र आलं, तर मला फार आनंद वाटेल.

**मल्लिका :** मला फार भीती वाटते, बाई. बाबांना काहीच माहीत नाही.

**सीता :** सगळे बाबा या बाबतीत सारखेच असतात. त्यांना कधीच माहीत नसतं. कोण आहे तो ?

**मल्लिका :** तो...ते...ते एक राजपुत्र आहेत.

**सीता :** राजपुत्र–कुठले ?

**मल्लिका :** इथून जवळच शिलावतीचं छोटं राज्य आहे.

**सीता** : शिलावती ? माहीत आहे.

**मल्लिका** : तिथले राजे नेहमी आमच्या आश्रमात येतात. बाबांवर फार भक्ती आहे त्यांची.

**सीता** : आणि राजपुत्राची तुझ्यावर ?

**मल्लिका** : बाई ! अशानं मी बोलणारच नाही.

**सीता** : बरं, नाही बोलत मी. पुढे ?

**मल्लिका** : पुढे पुष्कळ घडलंय. पण ते नाही सांगणार मी.

**सीता** : राजपुत्र तुझ्याशी लग्न करणार आहे ?

**मल्लिका** : हो—पण बाबांची संमती—

**सीता** : काळजी करू नकोस. ती संमती मी मिळवीन. पण मुलगा आमच्या मल्लिकेला साजेलसा आहे ?

**मल्लिका** : स्फटिकासारखे निर्मळ आहेत ते. पण बाई, मला धास्ती वाटते. रानाबनात झुडपासारखी वाढलेली मी—

**सीता** : मुळीच घाबरू नकोस. रीतीरिवाज जमिनीवर पडलेल्या वस्तूसारखे सहज उचलता येतात. पण रानात काय, राजवाड्यात काय, महत्त्व असतं रिवाजांच्या पलीकडे असलेल्या मनाचं.

**मल्लिका** : बाई, राजवाड्यातली माणसं कशी असतात हो ? त्यांनाही दोन माता आहेत.

**सीता** : मग दोघींचं प्रेम मिळेल तुला.

**मल्लिका** : पण एखादी कैकयीसारखी असली तर ?

**सीता** : तुला काय माहिती ?

**मल्लिका** : इथे वार्ता येतात. फारच भयंकर बाई आहे म्हणे ती.

**सीता** : कुणी सांगितलं तुला ?

**मल्लिका** : मी नदीवर पाणी आणायला जाते ना. तिथे दुसऱ्या आश्रमातील मुली— माझ्या मैत्रिणीच आहेत त्या—त्या सांगत होत्या.

**सीता** : काय ?

**मल्लिका** : म्हणतात की, कैकयी ही ताडासारखी उंच आणि कोळशासारखी काळीकुट्ट आहे. तिचे दात लांडग्याच्या सुळ्यासारखे पुढे आलेले आणि डोळे पळसाच्या फुलासारखे तांबडेलाल आहेत. आणि म्हणे तिला रोज सकाळी उठल्याबरोबर वाघाचं रक्त लागतं प्यायला आणि—

**सीता** : ( हसते ) पुरे पुरे ! वार्ता वाऱ्यावर वाहायला लागल्या की त्यातलं सत्य गळून पडतं, आणि रिकामटेकड्या लोकांच्या कल्पना फक्त शिल्लक राहतात. वेडे, तसं काहीही नाही बरं. सगळं खोटं आहे. कैकयीमाता अतिशय सुंदर, आणि प्रेमळही आहेत.

**मल्लिका :** आणि तरीदेखील त्यांनी हे केलं ?

**सीता :** मुलाच्या मायेनं. तू आई होशील तेव्हा–

**मल्लिका :** काही तरीच !

**सीता :** तेव्हा कळेल तुला. आणि मलाही कळेल. प्रत्येक आईच्या काळजामध्ये एक कैकयी राहात असते–जाऊ दे ते. मुनींना सांगेन मी. ( तिला जवळ घेऊन ) मुळीच काळजी करायची नाही.

**मल्लिका :** नाही करणार.

**सीता :** हे दोन हार तू घेऊन जा आणि वहा देवांना. आणि हा माझा—( एका वेलीवर लावते )

**मल्लिका :** ( भयभीत ) बाई, हे आवाज कसले येताहेत ? डोंगराच्या पायथ्याशी काही तरी घडलेलं दिसतंय्—मी पाहते – या बाजूनं खालचं रान दिसतं—( पलीकडे जाऊन ) बाई ! ते बघा ! त्या रानातली सगळी झाडं, शंभर वादळं कोसळल्यासारखी सैरभैर हेलकावताहेत—इकडे या–बघा–काही झाडं कोसळून पडताहेत—

**सीता :** ( तिकडे जाऊन ) खरंच ! काय उत्पात झालाय् देव जाणे.

**मल्लिका :** बाई—ते बघा, हत्तींचे आणि गव्यांचे कळप पिसाटपणानं धावताहेत—सारीच श्वापदं सैरावैरा पळताहेत—

**सीता :** त्यांच्या राहत्या जागांवर आकाश कोसळल्याप्रमाणे—काय घडलंय् कुणास ठाऊक !

( राम प्रवेश करतो. )

**राम :** काही विशेष घडलेलं नाही.

**मल्लिका :** ( लगबगीनं माघारी येत ) बाई, मी जाते.

( जाते. )

**सीता :** ( मागे येत ) तुम्ही पाहिलंत ? जनावरांच्या धावपळीनं सारं रान कसं घुसळत होतं. आता जरा शांत झालेलं दिसतं. पण आपण शोध घ्यायला हवा.

**राम :** शोध घेतला आहे.

**सीता :** मग ? माझ्या छातीत धडधडायला लागलंय्. पहाडावर कुठे वणवा तर पेटला नाही ! एरव्ही श्वापदं इतकी भयभीत व्हायची नाहीत.

**राम :** श्वापदांना भयभीत करणारं सर्वांत भीतिदायक श्वापद म्हणजे माणूस. अशा माणसांचा कळप आला की जनावरं सैरावैरा धावायला लागतात.

**सीता :** कोणी माणसं आली आहेत ?

**राम :** उत्तरेकडच्या क्षितिजावर धुळीचे ढग उजाडताना दिसत होते. घटकेच्या आत ते ढग डोंगराच्या पायथ्याशी आले आणि थोड्याच वेळापूर्वी धुळीचं आवरण बाजूला होऊन, एका मोठ्या थोरल्या सैन्याचं शिबिर तेथे उभं होत असलेलं

आम्हाला दिसलं.

**सीता** : सैन्य ?

**राम** : ऐश्वर्याबरोबर आपली भीतीही आपण अयोध्येच्या राजवाड्यात ठेवून आलो आहोत, जानकी.

**सीता** : नाही—मला भीती वाटत नाही. निदान स्वतःसाठी वाटत नाही.

**राम** : आमच्यासाठीही वाटायचं कारण नाही. आम्ही वनवासी असलो तरी शस्त्रं खाली ठेवलेली नाही. क्षत्रियांना ती मुभाच नाही.

**सीता** : पण आपण या अरण्यात असे एकाकी—फक्त तिघेच.

**राम** : आपण तिघेच नाही. एक चौथाही आपल्याबरोबर वनवासाला निघाला आहे, आपल्याला साथ करतो आहे. आणि हा चौथा असा आहे की, ज्याच्यासमोर विश्वातील साऱ्या आक्रमक, दुष्ट शक्ती निःशेष होतात.

**सीता** : कोण आहे तो ?

**राम** : अर्थात परमेश्वर—आपल्या अंतःकरणातला.

**सीता** : माझ्या अंतःकरणात तो परमेश्वर नाही. जो आहे तो माझ्यासमोर उभा आहे. आणि म्हणून मला धास्ती वाटते. सांगा ना, कोणाचं सैन्य आहे ते.

**राम** : ( हसतो ) त्याचा शोध घेण्यासाठी लक्ष्मण आम्रवनातील उतरणीवर गेला आहे. अर्ध्या घटकेपूर्वी. पण शक्यता आहे की ते सैन्य आपलंच आहे.

**सीता** : आपलं—म्हणजे—

**राम** : आपलं नव्हे. अयोध्येचं. शब्द असा पाठलाग करीत असतात माणसाचा. अर्थ हरवल्यावरसुद्धा.

**सीता** : अयोध्येचं सैन्य इथं कशाला येईल ? आपल्याच मनातलं काही तरी.

**राम** : हा केवळ तर्क आहे. भारद्वाजांचा आश्रम सोडून आपल्याला फार दिवस झाले नाहीत. एवढ्या अल्प काळात फक्त अयोध्येचीच सेना ह्या मार्गानं चित्रकूटापर्यंत पोचू शकेल. जाऊदेत. कोणाचंही का असेना ते सैन्य, त्या जगाशी आपला संबंध उरलेला नाही. अयोध्येपेक्षा फार मोठ्या राज्याचे आपण आता रहिवासी झालो आहोत.

**सीता** : एक सांगू का ?

**राम** : सांग की.

**सीता** : थट्टा करायची नाही.

**राम** : नाही करणार.

**सीता** : आज सकाळी मी सडासंमार्जन करीत होते, तेव्हा एक शुभशकुन झाला. तेव्हापासून वाटत होतं, आज काहीतरी विशेष घडणार म्हणून.

**राम** : काय शकुन झाला ?

**सीता :** तो समोरचा औदुंबर आहे ना, त्याच्या फांद्यावरून अकस्मात् तीन भारद्वाज पक्षी खाली झेपावून आले आणि माझ्याभोवती रिंगण घालून आकाशात उडून गेले.

**राम :** जानकी, भारद्वाजाभोवती माणसानं प्रदक्षिणा घालणं हा शुभशकून आहे. हे त्याच्या उलट घडलं.

**सीता :** मग हा अपशकून आहे?

**राम :** ( खोट्या गांभीर्यानं ) बहुधा असावा.

**सीता :** काय होईल आता?

**राम :** बहुधा कोणी तरी राक्षस येईल आणि तुला पळवून नेईल.

**सीता :** आणि तुम्हाला बरं वाटेल?

**राम :** कदाचित नाही वाटणार.

**सीता :** कदाचित! मी आत जाते, पुष्कळ कामं आहेत मला. आणि तुम्हालाही कदाचित बरं वाटेल.

**राम :** ( हात धरून अडवतो ) वेडी आहेस का? हा सुंदर रुसवा पाहाण्यासाठीच बोललो मी.

**सीता :** खोटं!

**राम :** जानकी, तू जितकी सौभाग्यवती त्यापेक्षा मी अधिक सौभाग्यवान आहे. या सौभाग्याचा दुरावा मला क्षणभर तरी सहन होईल का?

**सीता :** मधाची पेरणी एका माणसाला छान करता येते. रिकाम्या हातांनीच आलात. म्हटलं, सकाळी मी सांगितलं होतं, की येताना माधवीची फुलं घेऊन या म्हणून. विसरलात!

**राम :** खरंच. या सैन्याच्या धामधुमीत तिकडे जायला जमलंच नाही मला. मी आता घेऊन येतो. फार वेळ लागणार नाही.

**सीता :** ( अडवून ) नको. तुम्ही विसराल हे मला माहीत होतं. पराक्रमाचा पाठलाग करणाऱ्या पुरुषांना प्रेमाची आठवण राहात नाही पुष्कळदा. घरात असतील तेवढेच घरचे, एरव्ही बाहेरचेच. पण तुम्हाला आवडणारी माधवी दूर असली तरी मला आवडणारा सोनचाफा या जवळच्या रानात हवा तेवढा आहे. आणि आज तर प्रत्येक चाफ्यानं माझ्यासाठी हरिश्चंद्राचा अवतार धारण केला होता. आपलं सारं सोनेरी भांडार आज त्यांनी माझ्यासाठी फुलवलं होतं. ( हार आणते ) हा पाहिलात का हार? माझ्या हातानं गुंफला आहे. मल्लिका वारंवार म्हणत होती, पण मी नाही तिच्याकडे दिला. म्हटलं, आज फुलं मी तोडणार, हार मी गुंफणार, आणि मीच तो असा एका माणसाच्या गळ्यात घालणार. ( हार घालते. )

**राम :** किती सुंदर आहे! पण आज काय आहे? कशासाठी हा हार?

**सीता :** तुमचं कुणास ठाऊक. पण माझ्या आयुष्यातला परम भाग्याचा दिवस आहे आज. आजची तिथी कोणती आहे, आहे लक्षात ?

**राम :** राजवाड्यामध्ये रोज सकाळी पुरोहित येऊन तिथी सांगतात. पण इथं आपण अरण्यात आहोत जानकी.

**सीता :** तिथी सांगणारे सर्वांत मोठे पुरोहित म्हणजे चंद्र आणि सूर्य. ते राजवाड्यात असतात तसे रानातही असतात. तुमच्या नाही लक्षात यायचं. हरलो म्हणा.

**राम :** हरलो.

**सीता :** आज सातवा चंद्र आहे माघातला. आठवतंय् अजून तरी ?

**राम :** आठवलं. याच मुहूर्तावर सीता नावाच्या वेड्या मुलीनं माझ्या गळ्यात माळ घातली होती.

**सीता :** त्या भाग्यशाली दिवसाची आठवण म्हणून मी हा हार आज घातला आहे. राम नावाच्या एका शहाण्या राजपुत्राच्या गळ्यामध्ये.

**राम :** सीतेसारखी पत्नी मिळाल्यावर कोणता राम शहाणा राहील ! ( हातात हात घेऊन ) जानकी. मी काय देऊ तुला ?

**सीता :** फक्त आशीर्वाद द्या. त्या वेड्या मुलीचं वेड जन्मभर असंच टिकावं म्हणून.

**राम :** ते चित्र आजही माझ्या डोळ्यांसमोर उभं आहे. मुहूर्ताचा क्षण येताच, मंत्रांचे घोष झाले, मंगल वाद्यांचे गजर झाले, आणि दूर सरकणाऱ्या मखमली पडद्यातून तू बाहेर आलीस. लालसोनेरी वस्त्रं परिधान केलेली, रत्नांच्या अलंकारांनी लखलखणारी अशी तू, तेजोमय लावण्याचे किरण उधळीत जेव्हा माझ्याजवळ आलीस, तेव्हा वाटलं की क्षितिजाच्या पायऱ्या उतरून ही साक्षात् वासंतिक उषाच आपल्यासमोर उभी आहे.

**सीता :** ते एक सुंदर स्वप्न होतं.

**राम :** ते स्वप्न अजूनही मावळलेलं नाही. ती राजसभा नाही, ते वाद्यांचे गजर नाहीत, ती जरतारी वस्त्रं नाहीत आणि तो हिऱ्यामोत्यांचा लखलखाटही नाही. —पण तू आज मला तितकीच सुंदर, तितकीच तेजस्वी आणि तितकीच सत्त्वशील दिसते आहेस. किंबहुना जास्त. कारण तुझ्या सौंदर्याला आणि तेजाला हिऱ्यामोत्यांचा हातभार नाही, राजमहालाचं कोंदण नाही. आता तू फक्त तूच आहेस. आणि त्या रत्नमंडित सीतेपेक्षा तू या क्षणी मला अधिक सुंदर, अधिक तेजस्वी दिसते आहेस.

**सीता :** हा सारा प्रभाव आपल्या दृष्टीचा आहे. सूर्योदयाचं ऊन अंगावर पडलं की पायाखालची शिळादेखील माणकासारखी लखलखायला लागते.

**राम :** तसं असेल तर ही दृष्टी माझ्याशिवाय इतर कोणाला न लाभो.

**सीता :** ( स्मित ) आणि कोणाला लाभलीच तर ?

**राम :** तर माझं सौजन्य संपेल आणि संग्रामाला प्रारंभ होईल. संग्राम मला प्रिय नाही, पण संग्राम करावाच लागला तर माझ्या इतक्या समर्थपणानं तो करणारी माणसं, या संसारात शोधूनही सापडायची नाहीत. आहे तुझा विश्वास ?

**सीता :** तो विश्वास म्हणजेच माझं जगणं आहे.

**राम :** माझी लाडकी– ( तिला जवळ घेऊ लागतो. )

**सीता :** ( दूर होऊन ) नको. पाचोळ्यावर पावलं वाजताहेत. कोणीतरी येत आहे.

**राम :** बहुधा लक्ष्मण असेल– ( हार काढून देत ) हा हार आत नेऊन ठेव. माझी ही श्रीमंती चारचौघांसमोर मांडायला नको—

( सीता आत जाते. लक्ष्मण प्रवेश करतो. )

**लक्ष्मण :** रामा, ती सेना राघवांचीच आहे याबद्दल माझी खात्री पटली आहे.

**राम :** तू शोध घेतलास ?

**लक्ष्मण :** हो. आपल्या चार-पाच भिल्ल मित्रांना मी डोंगराच्या पायथ्याशी पाठवलं होतं. त्या शिबिरापर्यंत जाऊन त्यांनी शोध घेतला. ( सीता झोपडीच्या दारात येऊन उभी राहते. )

सेना अयोध्येचीच आहे आणि कैकयीपुत्र भरत सेनेचं नेतृत्व करीत आहे.

**सीता :** ( हर्षभरित ) भरत आला ?

**लक्ष्मण :** हे भिल्लांकडून कळलं आणि मीही नंतर खात्री करून घेतली. पूर्वेकडच्या पहाडावरून खालच्या मैदानाचं दृश्य दिसतं. तेथून पाहिलं मी. शेकडो मंडपघरांनी मैदान झाकून गेलं आहे. आणि शिबिराच्या मध्यभागी असलेल्या सोनेरी मांडवावर राघवांचा सूर्यध्वज फडकतो आहे.

**सीता :** किती आनंदाची वार्ता आहे ही ! ( रामाकडे ) बघितलंत ? मी म्हटलं तेच बरोबर होतं. भारद्वाजांचा तो शुभशकुनच होता. काहीतरी चांगलं घडेल, असं वाटत होतं मला. पण इतकं चांगलं ! किती दिवसांनी भरताची भेट होणार आहे ! आणखी कोणकोण असेल त्यांच्याबरोबर ? पण खरंच, ते येतील ना आपल्याला भेटायला ? नाहीतर, कामधेनू आली आणि दारावरून निघून गेली असं व्हायचं. मीच बडबडते आहे. ( रामाला ) ही वार्ता ऐकून तुम्हाला आनंद वाटत नाही ?

**राम :** आपण अयोध्या सोडली, पण अयोध्या आपल्याला सोडायला तयार नाही असं दिसतं. जर ते आपल्याचसाठी आले असतील तर.

**लक्ष्मण :** आपल्याचसाठी आले आहेत.

**सीता :** दुसऱ्या कोणासाठी येणार इतक्या दूरवर ? आपल्यालाच भेटायला आले आहेत ते.

**राम :** पण हेही शक्य आहे की, भरत सैन्य घेऊन कोठल्या तरी स्वारीवर निघाला आहे आणि त्याचा तळ योगायोगानं चित्रकुटाच्या पायथ्याशी पडला आहे आणि

आपण इथं आहोत हेही कदाचित् त्याला माहीत नसेल.

**सीता :** शक्य नाही. ते भारद्वाजमुनींची भेट घेऊन आलेले असणार. तुम्ही माझी थट्टा करता आहात...मुद्दाम माझी आशा मोडून काढता आहात. खरं ना ?

**राम :** होय, खरं आहे. तुझ्या आनंदाचीच मला चिंता वाटते. जानकी, तुझ्या मनातली अयोध्या अजून मावळलेली दिसत नाही. आणि ती मावळली नसेल तर आपले वनवासातील रस्ते कधी सुखाचे आणि सुसह्य व्हायचे नाहीत.

**सीता :** पण मी म्हणते, आपली जिवाभावाची माणसं इतक्या दिवसांनी भेटली तर माणसाला आनंद होऊ नये ?

**राम :** ( हसतो ) हिमालयात निघालेल्या संन्याशानं आपल्या कफनीत तिजोरीच्या चाव्या नेण्यासारखं आहे हे. त्यात संन्याशाला सुख नाही आणि तिजोरीलाही संरक्षण नाही.

**सीता :** मला समजत नाही. आपण त्यांना भेटायचं नाही ?

**राम :** ( स्मित ) भेटायचं की. न भेटणं हीसुद्धा एक शरणागतीच आहे. भेटीचा आनंद अवश्य घ्यायचा, पण स्वतःपासून दूर जायचं नाही.

**लक्ष्मण :** रामा, तुम्ही समजता इतकी ही भेट सुखाची होईल असं मला वाटत नाही.

**राम :** म्हणजे काय ?

**लक्ष्मण :** आपण कोणत्याही प्रसंगाला तोंड द्यायला तयार राहायला हवं.

**राम :** भरत आपल्याला भेटायला आलेला नाही ?

**लक्ष्मण :** शक्यता आहे की तो आपल्याला मारायला आला आहे.

**राम :** तू काय बोलतो आहेस, लक्ष्मणा ?

**लक्ष्मण :** विषयलंपट बाप आणि कुटिल कारस्थानी आई यांच्यापासून जन्मलेलं अपत्य सरळ बुद्धीचं असेल, असं मानणं कठीण आहे.

**सीता :** कसं बोलवतं हे तुमच्याच्यानं ? आपण घर सोडलं म्हणजे नाती तोडली नाहीत. निदान वडिलांच्याविषयी असं बोलणं बरं नाही.

**लक्ष्मण :** सगळं जग बोलतंय, देवी.

**सीता :** जग बोलू दे हवं ते. थोरले महाराज आपले वडिलधारे आहेत, जगाचे नाहीत.

**राम :** तुझ्या मनात अशी शंका का आली ? भरत कसा आहे हे आपल्याला माहीत आहे.

**लक्ष्मण :** कैकयी कशी आहे हेही आपल्याला माहीत होतं. क्षमा कर, रामा, तू सौजन्यशील आहेस आणि सौजन्याचं आकलन व्यवहारापर्यंत पोचत नाही. पौर्णिमेचा चंद्र आपल्या चांदण्यातूनच साऱ्या विश्वाला पाहात असतो. केरकचऱ्याचे ढीग आणि जहराचे डोहसुद्धा त्या चांदण्यात सुंदर दिसतात. पण सुंदर दिसतात. म्हणून सुंदर असतात असं नाही.

**राम :** काय म्हणायचं आहे तुला? महात्म्याचं मन असलेला भरत आपल्यावर प्रहार करील? आणि कशासाठी?

**लक्ष्मण :** सिंहासनासाठी.

**राम :** ते त्याला मिळालेलं आहे.

**लक्ष्मण :** सिंहासन मिळून भागत नाही. ते सुरक्षित करावं लागतं, स्वत:साठी आणि आपल्या वंशावळीसाठी. भरत महात्मा असेलही, पण सत्तेच्या सहवासात महात्म्यांचेही दुरात्मे व्हायला लागतात.

**राम :** ( हसत ) तसं असेल तर मला वनवासात यावं लागलं ही नियतीची कृपाच समजायला हवी. नाहीतर सत्तेच्या सहवासात मीही दुरात्मा झालो असतो, महात्मा नसूनसुद्धा.

**सीता :** ( स्मित ) आणि मग माझी अवस्था काय झाली असती? तुम्ही तर मला भिरकावून दिली असती वाऱ्यावरती—

**लक्ष्मण :** रामा, तुझ्या अनुज्ञेशिवाय मी या प्रदेशातील भिल्ल नायकांना निरोप दिला आहे. एका घटकेच्या आत तीनहजार भिल्ल तिरकामटे आणि भाले घेऊन चित्रकुटाच्या पायथ्याशी उभे राहतील.

**राम :** केलंस ते ठीक केलंस. पण असा काही प्रसंग येईल असं मला वाटत नाही. चांगुलपणावर माझा अढळ विश्वास आहे.

( मल्लिका धावत येते. )

**मल्लिका :** ( सीतेजवळ जाऊन ) बाई, खालच्या शिबिरातली चार-पाच माणसं तुमच्या पर्णकुटीकडे येताहेत.

**सीता :** कोठपर्यंत आली आहेत?

**मल्लिका :** अगदी या वळणाशी आली आहेत.

**राम :** भरतानं कोणाला तरी पाठवलेलं दिसतं.

( तुताऱ्या शिंगांचे आवाज )

**लक्ष्मण :** स्वत: भरतच आलेला आहे. राजपुरुषाच्या आगमनाची द्वाही देणारी वाद्यं आहेत ही. रामा, मी सावध आहे आणि तूही सावध राहा.

( भरत प्रवेश करतो. बरोबर शत्रुघ्न, सुमंत आणि दोन सैनिक. क्षणभर स्तब्धता. )

**राम :** ( पुढे होऊन ) ये भरता, अयोध्येच्या राजाचं मी स्वागत करतो.

**भरत :** ( रुद्ध स्वरात ) अयोध्येचा राजा तूच आहेस, रामा, फक्त तूच आहेस—

( धावत जाऊन रामाच्या पायावर डोके टेकतो. राम त्याला उठवून छातीशी धरतो. )

पडदा

## प्रवेश दुसरा

दोन दिवसांनंतर—
चित्रकुटावरील पर्णकुटी.
वेळ उतरत्या दुपारची.
सीता शिलाखंडावर बसलेली, लक्ष्मण एका झाडापाशी उभा. राम बोलत आहे. दोघेही एकाग्रतेने ऐकत आहेत.

**राम :** लक्ष्मणा, जानकी, आता अवधी फार थोडा उरला आहे. सूर्य अस्ताचलाकडे उतरण्यापूर्वी अयोध्येची सेना माघारी जायला निघणार आहे. पुरोहितांनी निश्चित केलेला मुहूर्त आहे तो. तो टळणार नाही. सारं शिबिर प्रस्थानासाठी सिद्ध झालेलं आहे.

**सीता :** भरत इकडे येणार आहे ?

**राम :** होय, आता एवढ्यात येईल. आपल्याला बरोबर घेऊन जाण्यासाठी.

**लक्ष्मण :** अयोध्येला ?

**राम :** अयोध्येला.

**लक्ष्मण :** आणि आपण जाणार आहोत ?

**राम :** तुमची इच्छा असेल तर.

**लक्ष्मण :** रामा, अयोध्येच्या राजवाड्यातून आपण बाहेर पडलो तेव्हाच आम्ही आमची इच्छा तुझ्या स्वाधीन केली होती. तुला माघारी जायचं नाही, हे मला माहीत आहे. जानकीदेवीलाही माहीत आहे. मग हा प्रयत्न कशाकरिता ?

**राम :** लक्ष्मणा, प्रत्येक माणूस शेवटी आपल्या आयुष्याचा धनी असतो, एकटा. माणसाचं जीवन हे पृथ्वीवरील जीवनाचं, तर इच्छाशक्ती हे माणसाच्या जीवनाचं अंतिम संचित आहे. ते कोणीही कोणाच्या स्वाधीन करू नये. प्रेमाची महती मी जाणतो. प्रेमाच्या निःस्वार्थ, निर्मळ रूपामध्येच ईश्वराचं रूप प्रगट होत असतं.

पण तरीही मला वाटतं, प्रेमासाठीसुद्धा स्वतःसंबंधीच्या सर्व जबाबदाऱ्या माणसानं झुगारून देऊ नयेत. जगणं हा माणसाचा केवळ अधिकार नाही, ते त्याचं कर्तव्यही आहे. आणि जगणं म्हणजे नुसतं जिवंत राहणं नव्हे, तर ज्या परिसरात आपण जन्माला येतो तो आपल्या अस्तित्वानं अंशमात्र का होईना, अधिक श्रीमंत, अधिक प्रकाशमय करणं.

**लक्ष्मण :** हे कर्तव्य आम्ही कसं पार पाडावं असं तुझं सांगणं आहे?

**राम :** वनवासाच्या वचनाला मी एकटाच बांधलेला होतो, आणि एकट्यानंच वनवासाला जावं अशी माझी मनीषा होती. पण तुम्ही दोघे सूर्यचंद्रासारखे माझ्या दोन्ही बाजूला उभे राहिलात आणि आपल्या उमलत्या जीवनावर निखारे ठेवून, माझ्याबरोबर राजवाड्यातून बाहेर पडलात. मी धन्य आहे, असं अलौकिक प्रेम मला लाभलं म्हणून. सीताराम आणि रामलक्ष्मण हे समास काळालाही तोडता येणार नाहीत; आणि ते तुम्ही जन्माला घातले आहेत. आणि तरीही मला वाटतं—

**लक्ष्मण :** ( क्षणभरानं ) काय वाटतं?

**राम :** हे शब्द माझ्या वाणीला पेलवत नाहीत—पण मला वाटतं, तुम्ही दोघांनी भरताबरोबर परत जावं. आपली सोन्यासारखी आयुष्यं चौदा वर्षे तुम्ही वनवासात कुजवावीत हे मला योग्य आणि न्याय्यही वाटत नाही. एका रामासाठी आपल्या जीवनाचं बलिदान करायचं, की कोट्यवधी प्रजाजनांच्या सेवेनं ते सफल करायचं, याचा विचार तुम्ही करायला हवा. ही एकच संधी आहे, जी कदाचित पुढच्या चौदा वर्षांत पुन्हा कधीही मिळायची नाही.

**लक्ष्मण :** देवी, तुमचं उत्तर काय आहे?

**सीता :** शब्द सुंदर आहेत, आकाशातून उडत जाणाऱ्या हंसाच्या थव्यासारखे. पण ते माझ्या मनावर उतरलेच नाहीत. हा माणसाच्या स्वतंत्र इच्छेचा प्रश्न आहे ना? मग माझी इच्छा—नव्हे माझी प्रतिज्ञा मी सांगते. जिथे राम आहे तिथे जानकी आहे. यात कालत्रयी अंतर पडणार नाही.

**लक्ष्मण :** आणि माझीही प्रतिज्ञा—जिथे राम आणि सीता आहेत, तिथे लक्ष्मण आहे. यातही कालत्रयी अंतर पडणार नाही. रामा, तू म्हणतोस ते खरं आहे, पण ते तुझ्यासारख्याच्याच संबंधात समईत ज्योत असते आणि दीपस्तंभातही ज्योत असते. पण दोघांची जीवनकार्ये वेगळी, क्षेत्रं वेगळी आणि मर्यादाही वेगळ्या. समईनं आपण दीपस्तंभ आहोत असं समजून समुद्र प्रकाशित करायला जाणं वेडेपणाचं होईल. त्याप्रमाणे तुझ्यासारख्यांचं जगणं अंतिम नीतीशी बांधलेलं असतं, तर माझ्यासारख्यांचं जगणं अंतिम प्रेमाशी. प्रेमाच्या पलीकडे आमच्या अस्तित्वाला अर्थच राहणार नाही—भरत येतो आहे—ही चर्चा संपली, आम्ही तुझ्याबरोबर येणार आहोत—

( शिंगांचे आवाज. भरत येतो. बरोबर सुमंत, काही ध्वजधारी सैनिक आणि नेसत्या वस्त्राचा पदर ओढून घेतलेली कैकयी. सर्वजण मागे दूर उभी राहतात— चेहऱ्यावर भरत पुढे येऊन प्रणाम करतो. )

**राम** : स्वागत असो, भरताचं आणि आपणा सर्वांचं.

**भरत** : प्रस्थानाची घटका जवळ आली आहे. तू सांगितल्याप्रमाणे मी आलो आहे..

**राम** : तुमचा प्रवास सुखाचा होवो ही देवाकडे माझी प्रार्थना.

**भरत** : तुमचा नव्हे, आपला.

**राम** : तेच मी सांगणार आहे—पण ही–या–कोण ?

**भरत** : ही आहे दशरथराजाची एक विधवा – कैकयी.

**लक्ष्मण** : तुझी आई !

**भरत** : एक वेळची.

**राम** : कैकयी माता !

**सीता** : भगवती—

**राम** : जानकी, ( पुढे होऊन ) आपण दोघं आईच्या पायाला—

**भरत** : ( अडवून ) नाही, तिच्या पायालाच काय, पण तिच्या सावलीलासुद्धा कोणी स्पर्श करायचा नाही !

**लक्ष्मण** : ( उसळून ) आईच्या पायाला स्पर्श करण्यासाठी कोणाची संमती लागत नाही. भरत, बाजूला हो, रामाची इच्छा असेल तर—

**भरत** : तरीही कोणीही तिच्या जवळ जायचं नाही, तिच्याशी बोलायचं नाही.

**सीता** : पण भावोजी,

**लक्ष्मण** : रामाला आज्ञा करायचं हे तुझं उद्धट धाडस ? कैकयी म्हणजे पृथ्वीवर नरकातून उतरलेलं पाप आहे, असंच मी मानतो. रामाची इच्छा मला प्रमाण नसती तर, आपल्या पलंगप्रेमानं पतीला दास करणाऱ्या आणि रामसीतेला वनवासात पाठविणाऱ्या या स्त्रीला, मीच केस धरून राजवाड्यातून बाहेर खेचली असती–

**राम** : लक्ष्मणा ! आपल्या घराच्या अंगणात आलेल्या अभ्यागतेचा तू अपमान करतो आहेस. मला शरम वाटते तुझ्या बोलण्याची.

**लक्ष्मण** : रामा, मी क्षमा मागतो तुझी आणि त्या स्त्रीचीही. मी असं बोलायला नको होतं. पण भरताला मी अजूनही सांगतो, रामाला आदेश देण्याचा अधिकार त्याला नाही. भरत राजा असला तरी त्याचा अधिकार त्याच्या राज्यामध्ये. चित्रकुटावरील या पर्णकुटीमध्ये नाही. रामाची इच्छा असेल तर तो त्या स्त्रीच्या पायाला स्पर्श करील. कोणी त्याला इथं अडवू शकणार नाही.

**भरत** : मी रामाला आदेश दिला नाही, लक्ष्मणा. मी माझी इच्छा सांगितली. कैकयी आज राजमाता राहिलेली नाही, ती फक्त राजविधवा आहे. आणि म्हणून–

**सीता :** भावोजी, काय बोलता आहात ?

**भरत :** अयोध्येत परत आल्यावर, हा सर्व इतिहास जेव्हा मला समजला तेव्हा, त्या क्षणी, कैकयीशी असलेलं माझं पुत्राचं नातं मी समूळ तोडून टाकलेलं आहे. जी माझी आई नाही, ती आता तुमचीही कोणी नाही. आणि म्हणून तिच्या पायाला रामानं वा जानकीनं स्पर्श करणं, म्हणजे ते मेलेलं नातं पुन्हा जिवंत करणं आहे. ते मला आवडणार नाही, एवढंच मला सांगायचं आहे.

**सीता :** आईचं नातं असं तोडता येतं ?

**भरत :** मी तोडलं आहे ते.

**राम :** भरता, इतर सारी नाती मानीव असतात, पण आईचं नातं हे एक स्वयंसिद्ध आणि चिरंतन सत्य असतं. ते ईश्वरालाही तोडता येणार नाही. किंबहुना, विश्वातील ईश्वरता माणसाच्या जवळ पोचलेली असते ती आईच्या नात्यानं. म्हणून एखाद्या नास्तिकानं ईश्वर नाकारला म्हणून त्याचं ईश्वरपण संपत नाही. त्याप्रमाणे मुलानं आई नाकारली तरी तिचं आईपण नाहीसं होत नाही.

**भरत :** रामा, तू ज्ञाता आहेस. मी तुला सांगावं असं नाही. पण संबंध आणि नातं या गोष्टी भिन्न आहेत. मी या स्त्रीच्या उदरातून बाहेर पडलो. हा तिच्याशी असलेला माझा संबंध आहे. तो मी नाकारू शकत नाही दुर्दैवानं. पण नातं ही माणसाच्या मनात निर्माण होणारी एक भावना आहे. ती मी नाकारू शकतो आणि नाकारली आहे.

**राम :** पण का ? पिताजींकडे वर मागण्याचा तिला हक्क होता. ते मागण्यात तिनं कोणतंही पाप केलेलं नाही.

**भरत :** पाप केलं असतं तर त्याचं प्रायश्चित्त तिला कोठेतरी भोगावं लागलं असतं. पण तिनं अपराध केला आहे. माझा, तुम्हा सर्वांचा, आणि अयोध्येच्या राज्यातील लक्षावधी नागरिकांचा. तो अक्षम्य आहे.

**राम :** मग तू तिला शिबिरात कशासाठी आणलीस आणि आता चित्रकुटावर तरी कशाकरता बरोबर घेऊन आलास ? हे सारं तिला ऐकवण्यासाठी ?

**भरत :** ऐकवण्यासाठी नाही, पाहण्यासाठी. जे नाटक तिनं सुरू केलं, त्याचा शेवटचा प्रवेश तिला आपल्या डोळ्यांनी पाहता यावा म्हणून. तिनं तोडलेला राज्यारोहण समारंभ अयोध्येत गेल्यावरती होईल. पण या पर्णकुटीच्या दारातच सूर्यवंशाचा किरीट मी तुझ्या मस्तकावर माझ्या मनानं चढवीत आहे. ही पायरी उतरताना तू अयोध्येचा राजा आहेस आणि तुझा वेत्रधारी म्हणून मी पुढे चालणार आहे. आपल्या कारस्थानाचा शेवट तिनं पाहायला हवा. रामा, तुझा निर्णय बदलला असेल असा मला विश्वास वाटतो. पुरोहितांनी दिलेला प्रयाणाचा मुहूर्त जवळ आलेला आहे. आपल्याला आता निघायला हवं.

**राम :** भरता, दोन दिवसांत मी जे वारंवार सांगितलं, ते अबाधित आहे. माझा निर्णय निश्चित आहे. आम्ही येणार नाही.

**भरत :** जानकीदेवी, लक्ष्मणा, तुम्ही रामाला काही सांगू शकत नाही ?

**सीता :** त्यांचा निर्णय मला मान्य आहे.

**लक्ष्मण :** आणि मलाही.

**भरत :** मग अयोध्येच्या राजवाड्यात प्रवेश करण्याची मलाही इच्छा नाही.

**राम :** हा प्रश्न तुझ्या इच्छेचा नाही, भरता. राज्याला नियंता नसला तर देशात अराजक माजतं आणि प्रजा चोरलुटारूंच्या पायाखाली चिरडली जाते. म्हणून राज्यशासनाची जबाबदारी स्वीकारणं हे तुझं कर्तव्य आहे. स्वतःच्या संतोषासाठी नव्हे, तर प्रजेच्या रक्षणासाठी.

**भरत :** क्षमा कर रामा, पण प्रजेच्या संबंधात तुझं कर्तव्य काहीच नाही ? तुझं नाही, लक्ष्मणाचं नाही, कर्तव्याचा धनी फक्त मीच आहे ?

**लक्ष्मण :** हा प्रश्न तुझ्या आईला विचार.

**भरत :** मी आधीच सांगितलं, माझी आई हा विषय संपलेला आहे. आता प्रश्न आहे तुमच्या, माझ्या, आपणा सर्वांच्या आईचा,—म्हणजे प्रजेचा. त्या प्रजेसाठीही तू—

**राम :** मी माघारी येणार नाही. मी वचनाला बांधलेला आहे. पिताजींना दिलेलं वचन. आणि आज पिताजी नसल्यामुळे त्या वचनातून मला मुक्त करण्याचा अधिकार आता कोणालाही नाही.

**भरत :** वचन महत्त्वाचं की प्रजेचं कल्याण ?

**राम :** अर्थात् प्रजेचं कल्याण ! आणि प्रजेचं पालन करायला तू अपात्र आहेस असं मला क्षणभरही वाटलं असतं, तर मी माघारी फिरलो असतो. पण भरत नावाचा रामाचा भाऊ, रामापेक्षाही अधिक कर्तबगार आणि नीतिशील आहे, हे लोकांना माहीत नसेल कदाचित, पण मला माहीत आहे. म्हणून मी निःशंक मनानं पुढे मार्गक्रमण करणार आहे.

**भरत :** माझ्या प्रशंसेनं मी अनुग्रहित झालो आहे. मी चांगला कारभार करीनही. पण लोकांना तू हवा आहेस. माझी नाही, पण लोकांची इच्छाही तू मानणार नाहीस ?

**राम :** तसाच प्रसंग येईल तेव्हा मानीनही. पण भरता, जिला तू लोकांची इच्छा म्हणतोस ती जास्तीत जास्त, काही लोकांची इच्छा असते. राजवाड्याच्या आणि राजसत्तेच्या जवळपास वावरणाऱ्या लोकांची. पण लोकांचा अफाट सागर पसरलेला असतो, लहान लहान गावांतून, शेतांतून, झोपड्यांतून, आणि जंगलातून. या लोकांना फक्त चांगलं शासन हवं असतं, शास्ता कोण आहे याचा विचार ते करीत नाहीत. ठीक आहे, भरता, सूर्य अस्ताचलाकडे येऊ लागला आहे. प्रयाणाची वेळ होत आली. तुम्हाला आता डोंगर उतरायला हवा—

**भरत :** होय, हे सर्व मला पतकरायला हवं हे आता माझ्या लक्षात आलं आहे.

**राम :** ( भरताच्या खांद्यावर हात ठेवून ) असा कष्टी होऊ नकोस, भरता. चौदा वर्षांचा काळ काही मोठा नव्हे, पुन्हा आपण भेटणार आहोत. आणि तुला एक शेवटचं सांगतो. अयोध्येच्या सिंहासनावर न्याय्य अधिकार तुझाच आहे. तुझ्या मातामहाला पिताजींनी तसं वचन दिलं होतं. हा वृत्तांत मला मागाहून, फार उशिरा कळला. म्हणून, जे तुझंच आहे त्याचा तू निःशंक मनानं स्वीकार कर आणि उत्तम प्रजापालन करून राघवकुलाची कीर्ती अधिक प्रकाशित कर.

**भरत :** आणि मी हे करीत असता, तुम्ही अरण्यातल्या वाटा तुडवीत राहणार.

**राम :** हा नियतीचा संकेत आहे. आणि या संकेताला सामोरं जाताना, आपण मानायला हवं की यातूनही काही भलं होणार आहे, आपलं आणि कदाचित जगाचंही.

**भरत :** रामा, तुझी आज्ञा मी ऐकली आहे आणि ऐकणार आहे. पण माझाही एक संकल्प आहे, आणि त्यासाठी मी तुझी संमती मागणार नाही. कितीही न्याय्य असलं तरी अयोध्येचं सिंहासन मी स्वीकारणार नाही. शासनाची जबाबदारी माझ्यावर आहे. माझ्या यातना बाजूला ठेवून ती मी पार पाडीन. तुझ्या आशीर्वादानं चांगल्या रीतीनं पार पाडीन. पण हे सर्व तुझा प्रतिनिधी आणि सेवाचारी म्हणून. सिंहासनावरती मी तुझी प्रतिमा ठेवीन, तुझ्या पादुका ठेवीन, आणि तुझा अमात्य म्हणून मी राज्यकारभार करीन. चौदा वर्षांचा काल मोठा नाही. हा सर्व काळ मी नगराबाहेर पर्णकुटीत राहीन, कंदमुळावर निर्वाह करीन, आणि गवताच्या शय्येवरती रात्र काढीन.

**राम :** पण भरता—

**भरत :** आता बोलायला अवसर नाही. आणि रामा, माझ्या संकल्पात तुझ्या संमतीचा सवालही येत नाही. सूर्य अस्ताचलाला स्पर्श करीत आहे. प्रयाणाची वेळ झाली. पर्णकुटीच्या बाहेर पडताना सुवर्णानं मढवलेल्या पादुका तू पायात घालाव्यास अशी माझी इच्छा होती. त्या पादुका आम्ही आणल्या आहेत. माझं एकच मागणं आता मान्य कर. त्या पादुकांना आपल्या पायांचा स्पर्श कर—त्या पादुका मी सिंहासनावर ठेवीन. सुमंत—

( सुमंत तबकातील पादुका भरताजवळ देतो ).

**भरत :** ( पादुका रामाच्या पायाजवळ ठेवीत )

ठेव पाय या पादुकांवर.

( सर्व जण भारावलेले. रामही डोळ्यातील पाणी पुसून पादुकावर पाय ठेवतो. भरत त्या उचलून छातीशी घेतो व रामाच्या पायाला शिरस्पर्श करतो ).

**भरत :** आशीर्वाद दे—तुझ्या विश्वासाला मी सदैव पात्र राहीन—

**राम :** ( त्याला उठवीत ) तथास्तु.

**भरत :** आणि तुमचाही.

( सीतेला, लक्ष्मणाला प्रणाम करतो ).

**राम :** आशीर्वाद देणाऱ्यालाही कोणाचे तरी आशीर्वाद लागतात. जानकी–लक्ष्मणा, मातेचे आशीर्वाद घ्या—( जानकी कैकयीला प्रणाम करते. कैकयी तिच्या पाठीवर हात ठेवते. सीता बाजूला होते. लक्ष्मणही चरणस्पर्श करतो ).

**राम :** माते, मीही तुला अभिवादन करतो. तुझ्यात आणि कौसल्येत मी कधी भेद मानला नाही. या घटकेलाही मानीत नाही. भरत क्रोधानं बोलला त्याचं दुःख मानू नकोस—

( कैकयीच्या पायावर डोके ठेवतो. ती त्याला उठवते आणि प्रथमतःच तोंडावर ओढलेला पदर बाजूला सारून म्हणते—)

**कैकयी :** रामा, माझी सर्व दुःखं संपली आहेत. एकच दुःख या क्षणी माझ्या अस्तित्वाला चहूकडून दंश करतं आहे, आणि ते म्हणजे, तू माझ्या उदरातून बाहेर पडला नाहीस. रामा, माझ्या लाडक्या, तुला–तुम्हा तिघांनाही—माझे सहस्र आशीर्वाद आहेत. मी तुझ्यावर लादलेला हा वनवासदेखील तुझी कीर्ती वाढवील आणि जगाला जगण्याची एक नवीन दिशा दाखवील—शुभम् भवतु ! शुभम् भवतु ! शुभम् भवतु !

[ पडदा ]

समाप्त

23330

IRBK-0123330